# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## दिनांक ३०-११-२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक ३० नोव्हेंबर २०१६ रोजी (का.प.क्र ३१) मा.महापौर श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-१५ वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरीया,आयएएस, नगर सचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
५. स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
१२. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१३. स.स. सौ.स्वाती किशोर नागरे
१४. स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान
१५. स.स.श्री.सचिन सुर्यकांत खैरे
१६. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१७. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१८. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१९. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
२०. स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
२१. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२२. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
२३. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२४. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२५. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२६. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२७. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२८. स.स.श्री.खान जहांगीर मुलानी

२९. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
३०. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे
३१. स.स. श्री.चित्ते नितीन रमन
३२. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर
३३. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३४. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३५. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३६. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३७. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३८. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३९. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
४०. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
४१. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
४२. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
४३. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४४. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४५. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४६. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४७. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४८. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
४९. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
५०. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
५१. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
५२. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
५३. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
५४. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
५५. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५६. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५७. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५८. स.स. श्री.शेख जफर अखतर
५९. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
६०. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
६१. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
६२. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
६३. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
६४. स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत
६५. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
६६. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन

६७. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
६८. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
६९. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
७०. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
७१. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
७२. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
७३. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
७४. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
७५. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
७६. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
७७. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
७८. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
७९. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
८०. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
८१. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
८२. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
८३. स.स. श्री.सोहेल शकील शेख
८४. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
८५. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
८६. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
८७. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
८८. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
८९. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
९०. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
९१. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
९२. स.स.श्री.थोरात दिलीप गंगाधर
९३. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
९४. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
९५. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
९६. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
९७. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
९८. स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
९९. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
१००. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
१०१. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
१०२. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
१०३. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
१०४. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे

१०५. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
१०६. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
१०७. स.स.कु.जमादार सायली भागवत

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.गजानन बारवाल :स.सदस्य श्री.घोडेले यांचे काका स्व.मुरलीधर घोडेले यांचे दु:खद निधन झाले श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :अनुमोदन आहे.

श्री.भगवान घडमोडे :मराठवाडयातील दोन जवान शहीद झाले त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

मा.महापौर :ठिक आहे श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी सर्वानी उभे रहावे.

यावेळी स्व.मुरलीधर घोडेले व दोन शहीद जवान यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.राजू शिंदे :नगरपरीषद व नगरपालिकेच्या निवडणूकीचा निकाल लागला नोटा बंदीचा परिणामामूळे तसेच मा.श्री.फडवणीस सरकारचे चांगले कामामूळे शिवसेना भाजपा पक्षाला चांगले यश प्राप्त झाले शिवसेना भाजपा सर्व पक्षीय नेत्याचे तसेच सर्व जनतेचा अभिनंदनाचा ठराव घ्यावा.

मा.महापौर :सर्वच पक्षाच्या उमेदवारानी निवडणुकीत यश प्राप्त केले सर्वच पक्षाच्या नेत्याचे अभिनंदन करण्यात येते.

**विषय क्रमांक ७७६:-** (दिनांक १९.११.२०१६ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार)

दि.२०.०२.२०१६, दि.१५.०३.२०१६ (२०.०२.२०१६ रोजीची तहकुब सभा), दि.१५.०३.२०१६, दि.२०.०४.२०१६,दि.१०.०५.२०१६,दि.१४.०६.२०१६,दि.११.०७.२०१६,दि.१०.०८.२०१६,दि.३१.०८.२०१६, दि.०६.०९.२०१६ व दि.२०.०९.२०१६ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.गजानन बारवाल :इतिवृत्ताचा विषय आहे मंजूर करण्यास हरकत नाही. दुरूस्ती सह मंजूर.

मा.महापौर :इतिवृत्ताचा विषय मंजूर.

**ठराव:-**

दि.२०.०२.२०१६, दि.१५.०३.२०१६ (२०.०२.२०१६ रोजीची तहकुब सभा), दि.१५.०३.२०१६, दि.२०.०४.२०१६,दि.१०.०५.२०१६,दि.१४.०६.२०१६,दि.११.०७.२०१६,दि.१०.०८.२०१६,दि.३१.०८.२०१६, दि.०६.०९.२०१६ व दि.२०.०९.२०१६ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७७:-** **(कार्यकारी अभियंता, जलनि:सारण विशेष प्रकल्प)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर हे एक ऐतिहासीक शहर असुन येथे पर्यटक, नागरीक, अभ्यागत तसेच येथील शैक्षणिक वातावरण पुरेसे पोषक आहे. त्यामुळे येथे लगतच्या

जिल्ह्यामधुन विद्यार्थी अभ्यासक मोठ्या प्रमाणावर येत असतात. या शिवाय येथे मौलाना आझाद संशोधन केंद्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र असल्याने व संशोधनाची पुरेशी सोय असल्याने येथे देशातील/परदेशातील/संशोधक विद्यार्थी येत आहे. मात्र तेथे शहरात शौचालयाची पुरेशी सोय नसल्याने येथे येणाऱ्या नागरिकांची/पर्यटक विशेषत: महिला वर्गाची गैरसोय होते. शहराचा व्याप वाढत असल्याने येथे विविध गर्दीच्या ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची सुविधा असणे आवश्यक आहे. तथापी, औरंगाबाद शहरात काही तुरळक ठिकाणचे "पे ॲण्ड युज" शौचालय वगळता शौचालयाची संख्या पुरेशी नाही. सद्यस्थितीत भारत सरकारकडुन स्वच्छ भारत अभियान राबविण्यात येत असून या कार्यक्रमाअंतर्गत देशातील विविध शहरामध्ये वैयक्तिक तसेच सार्वजनिक शौचालय बांधण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. मा.पंतप्रधान यांचा भारत वर्ष हागणदारी मुक्त करण्याचा फ्लॅगशिप कार्यक्रम आहे. त्यामुळे औरंगाबाद शहर हागणदारीमुक्त करण्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घेतला आहे.

आतापर्यंत औरंगाबाद शहरात विविध गर्दीच्या ठिकाणी स्वत:च्या आर्थिक तरतुदी मधून १६ ठिकाणी पे ॲण्ड युज शौचालय बांधली असून ५ ठिकाणी बी.ओ.टी.तत्वावर शौचालय बांधण्यात आलेली आहेत. वरील नमुद सर्व शौचालय आजमितीस कार्यरत आहेत. तथापी, सदर मनपाची शहरामध्ये असलेली विविध शौचालये मनपाची सध्या आर्थिक स्थिती सक्षम नसल्याने जुन्या शौचालयाची देखभाल दुरुस्ती करणे किंवा आवश्यकते प्रमाणे नवीन शौचालये बांधण्यास मर्यादा येतात. तसेच मनपाची जी सार्वजनिक शौचालय शहरामध्ये कार्यरत आहेत त्या पैकी बहुतांश ठिकाणी केअर टेकरची व्यवस्था नसल्याने शौचालय दुरुस्त केला तरी ती अल्प कालावधीतच ना दुरुस्त होतात. व त्याचा परिणाम नागरीकांच्या आरोग्यावर होऊ शकतो. शहराचा विकास व आवाका पाहता अशा शौचालयाची संख्या अपूरी पडत आहे.

यासाठी महानगरपालिकेने आवाहन केले असता शहरातील प्रतिष्ठीत नागरीक, सामाजिक संस्था (NGO), उद्योगपती पुढे येत असून त्या पे ॲण्ड युज पध्दतीवर चालविले जाणारे शौचालय त्यांच्या खर्चाने बांधून देण्यात तयार आहेत. याच अनुषंगाने लायन्य क्लब औरंगाबाद सेंट्रल यांनी आनंद गाडे चौक पिरबाजार उस्मानपुरा येथील ८० फुट रुंद रस्त्यावरील जुने ४६ बैठकी मनपाचे सार्वजनिक शौचालय पाडून त्या ठिकाणी अद्यावत सुविधेसह सुसज्ज असे पे ॲण्ड युज शौचालय स्व-खर्चाने महानगरपालिकेस बांधून देण्यास तयार असल्याचे कळविले आहे. तसेच या समवेतच सदर संस्था कबीर नगर भागातील मनपाची जुनी दोन शौचालय पाडून त्या ठिकाणी त्यांच्या खर्चाने पे ॲण्ड युज शौचालय बांधून देण्यास तयार आहेत. अशा प्रकारची शौचालये बांधल्या नंतर ते या शौचालयाचे परिचालन पुढील ३० वर्ष करणार आहे. यामध्ये शौचालय देखभाल दुरुस्तीचा खर्च, विद्युत देयकाचा खर्च व पाणी कराचा खर्च संबंधित संस्था करण्यास तयार आहेत. तरी उक्त स्वरुपाने सदर काम करण्यास लायन्स क्लब औरंगाबाद सेंट्रल यांना परवानगी देणे योग्य होईल तसेच यापुढेही ज्या ज्या संस्था अशा प्रकारे सामाजिक बांधीलकीच्या जाणीवेतून (सी.एस.आर.) बांधून देण्यास तयार असतील त्यांना कार्यालयातर्फे जागा उपलब्ध करून देणे, त्यांच्या समवेत आवश्यक अटी व शर्तीवर करार करणे, जुनी सार्वजनिक शौचालयाचे पाडकाम करणे व इतर अनुषंगीक कार्यवाही करणेचे अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

श्री.राजगौरव वानखेडे :शहरामध्ये असे किती नादुरूस्त सुलभ शौचालय त्याची यादी आहे का? अनेक संस्था असे काम करण्यास तयार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :अनेक ठिकाणी शौचालयाची गरज आहे. ३०-४० ठिकाणी शौचालय करण्याची यादी तयार केली होती. त्यासही मंजूरी दयावी.महिलासाठी स्वतंत्र शौचालय करावे.

श्रीमती माधुरी देशमुख :पाच ठिकाणी शौचालय बांधले असे म्हटले ते कोठे आहे.करारनामा केला का ती संस्था कोणती नाव काय संचालक कोण आहे. किती वर्षाचा करारनामा केला. पीर बाजार येथील शौचालयाचा एरिया किती आहे. कोर्टाने समिती गठीत केली होती. आम्ही भेटी दिल्या होत्या. ही जागा बघीतली तेंव्हा ती जागा कमर्शियल साठी चांगली आहे. तेथे कमर्शियल साठी कॉम्प्लेक्स बांधता येईल का ते काम करावे मनपास उत्पन्न येईल.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :तेथे पाहणी केली होती तेथील शौचालय खराब झाले आहे तेथील एरिया ५ ते ७ हजार स्क्वेअर फुटच्या वर असेल.

श्रीमती माधुरी देशमुख :प्लॅन व्यवस्थित करावा भविष्यात कॉम्प्लेक्स बांधता येईल का ते पहावे. जी समीती केली होती ती फक्त मा.कोर्टात ॲफीडेव्हीट देणे पुरतीच होती का पुढे समितीला अवगत करणार नाही का?

श्री.सचीन खैरे :बिबी का मकबरा येथे शौचालय करावे. टुरीस्ट येतात. तेथे जागा देण्यास एक व्यक्ती तयार आहे.

मा.महापौर :सुचना विचारात घ्यावी. जे जागा देण्यास तयार आहेत. बिबी का मकबरा येथे शौचालय करावे.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :करारनामा केलेला आहे ३० वर्षासाठी जागा लिजवर दिली आहे. काम सुरू आहे स्टेट कमेटी आली होती.

श्रीमती सत्यभामा शिंदे :एन-२ कामगार चौकात शौचालय बांधावे.

मा.महापौर :प्रशासनाने सुचनाची नोंद घ्यावी कार्यवाही करावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :जालना रोड मुकूंदवाडी भागात शौचालय करावे तेथे सिडकोची जागा उपलब्ध आहे.

श्री.गजानन बारवाल :प्रस्तावास मंजूरी द्यावी रेल्वेस्टेशन भागातही शौचालय करावे.

मा.महापौर :जेथे नागरीकांची जास्त वर्दळ आहे त्या ठिकाणी शौचालय करण्यात यावे तसेच मनपा मुख्य इमारतीतील सर्व शौचालय दुरूस्त करावे. साफसफाई ठेवावी.

श्री.गोकुळसिंग मलके :नारेगाव येथे शौचालय करावे.

श्री.नासेर सिद्यीकी :देखभाल दुरूस्ती त्याच संस्थने कायम करावी असे करारनाम्यात असावे.

श्रीमती स्वाती नागरे :भाजी मंडई एन-११ येथे शौचालय करावे.

मा.आयुक्त :जेथे शौचालय नाही तेथे करण्याचा प्रयत्न करू अनेक ठिकाणी डिमांड आली आहे. मागच्या वेळी १.३५ कोटी दिले होते त्यात ५ ठिकाणी केले एकूण १४ आहे.आंबेडकर नगर हर्षनगर, मिसारवाडी शताब्दीनगर या ठिकाणी प्रोव्हीजन केले आहे.त्याच बरोबर टी.व्ही.सेन्टर, मुकूंदवाडी, नेहरूनगर प्रादेशिक परीवहन कार्यालय येथे करण्याचे प्रोसेस मध्ये आहे. ज्या ठिकाणी डिमांड आली कामगार चौक, नारेगाव, जालना रोड, रेल्वेस्टेशन, तसेच टुरीस्ट ठिकाणी करण्याचा प्रयत्न करणार आहे. १६-१७ च्या बजेट मध्ये ७५ लक्षची तरतूद होती. त्यामध्ये बिबी का मकबरा, ज्युब्लीपार्क, औरंगपूरा, पैठणगेट,

| | |
|---|---|
| | सेव्हन हिल तसेच बॉटनिकल गार्डन येथे महिलांसाठी शौचालय प्रोव्हीजन केले आहे. आणखी काही डिमांड असतील तेथे करण्याचा प्रयत्न करू. |
| श्रीमती सत्यभामा शिंदे | :कामगार चौक येथे शौचालय करावे. |
| श्री.सुभाष शेजवळ | :माझ्या वार्डात नॅशनल हाय-वे येतो. पर्यटक जातात. नाल्यावर जागा आहे. तेथे शौचालय बांधावे. |
| मा.महापौर | :सदस्यांनी शौचालयाबाबत सुचना अधिकारी यांचेकडे द्यावी त्यानुसार बाजारपेठ, भाजी मार्केट महत्वाच्या जागेवर शौचालय करण्याचे प्रोव्हीजन प्रशासनाने करावे. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :यात अंतिम अधिकार आयुक्तांना द्यावे असे म्हटले परंतु जागा अंतिम केल्यानंतर सभेसमोर मान्यतेसाठी यावे. त्या त्या वार्डातील सदस्यांना माहिती द्यावी. |
| मा.महापौर | :विषय मंजूर |

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर हे एक ऐतिहासीक शहर असुन शहरात शौचालयाची पुरेशी सोय नसल्याने येथे येणाऱ्या नागरिकांची/पर्यटक विशेषतः महिला वर्गाची गैरसोय होत असल्याने महानगरपालिकेने आवाहन केले असता, याच अनुषंगाने लायन्स क्लब औरंगाबाद सेंट्रल यांनी आनंद गाडे चौक पिरबाजार उस्मानपुरा येथील ८० फुट रुंद रस्त्यावरील जुने ४६ बैठकी मनपाचे सार्वजनिक शौचालय पाडून या समवेतच सदर संस्था कबीर नगर भागातील मनपाची जुनी दोन शौचालय पाडून त्या ठिकाणी त्यांच्या खर्चाने “पे ॲण्ड युज” शौचालय बांधून देण्यास तयार असल्याने शौचालये बांधल्या नंतर ते या शौचालयाचे परिचालन पुढील ३० वर्ष शौचालय देखभाल दुरुस्तीचा खर्च, विद्युत देयकाचा खर्च व पाणी कराचा खर्च संबंधित संस्थेने करण्यासाठी परवानगी देण्यास परवानगी देण्यास व यापुढेही ज्या ज्या संस्था अशा प्रकारे सामाजिक बांधीलकीच्या जाणीवेतून (सी.एस.आर.) बांधून देण्यास तयार असतील त्यांना कार्यालयातर्फे जागा उपलब्ध करून देणे, त्यांच्या समवेत आवश्यक अटी व शर्तीवर करार करणे, जुनी सार्वजनिक शौचालयाचे पाडकाम करणे व इतर अनुषंगीक कार्यवाही करणेचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यास तसेच जागा निश्चित झाल्यानंतर त्याची माहिती मा.सर्वसाधारण सभेत देण्यास मंजरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७७८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पैठण रोड वरील मा.खासदार श्री.राजकुमारजी धुत यांच्या घरासमोरील आनंदविहार लिटीलवुड शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यांचे कॉंक्रीटींग करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन २०१५-१६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,९९,८७,२९५/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील पान क्र.GBR-Ward-F-Page No.08 वरील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग अ.क्र.७१ वर ठेवण्यात आलेल्या रक्कम रुपये २.०० कोटीच्या तरतुदीमधुन करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

करीता, प्रस्तावीत कामाचे रक्कम रुपये १,९९,८७,२९५/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

| | |
|---|---|
| श्री.राजू शिंदे | :या वार्डात जसे काम करण्याची गरज आहे त्याच प्रमाणे माझे वार्डात ही डिफर ची कामे होती त्या कामातील चार कोटी निधी शिल्लक होता. नव्याने काम करणार होते. प्रशासनाने नकार दिला. माझे वार्डातून जास्त कर वसुल होतो. ती कामे सन-२०११ ची होती काही कामे करणे बाकी आहे. ती केंव्हा होणार आहे. |
| श्रीमती माधुरी देशमुख | :१०० टक्के वसुली माझ्या वार्डात होते. एक कोटीचे काम करण्याची विनंती केली होती. काम होत नाही. वसुलीसाठी तीन-तीन वेळेस कर्मचारी वार्डात दुपारच्या वेळी घरी चकरा मारतात. जे लोक टॅक्स भरतात त्याचे मागे लागतो परवानगीची कागदपत्र कर्मचारी जाऊन मागतात ज्यांना कर लागलेला नाही. त्यांना कर लावावा तेथेही वसुली करावी. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :जे टॅक्स भरतात. त्याचे मागे आपण लागतो. जेथे टॅक्स लागला नाही. तेथे लावावा. ज्यांनी परवानगी घेतली नाही. त्याचेवर कार्यवाही होत नाही. कार्यपध्दती सुधारावी. जेथे नाही तेथे वसुली करावी कर लावावा. |
| श्री.राजू शिंदे | :माझ्या वार्डातील २०११ चे कामे आहेत ते काम होणार की नाही? काम चालू होते मध्येच बंद केले. निधी उपलब्ध होता. असे असतांना काम होत नाही. |
| मा.आयुक्त | :ज्यांना टॅक्स लागला नाही. तेथे कार्यवाही करणार आहे. विशेष करून काही ठिकाणी वापरात बदल झाला. निवासी वापराचे कमर्शियल झाले. त्यासाठी तपासणी कर्मचारी करीत असतील. |
| श्री.भगवान घडमोडे | :सिडकोची घरे स्कीमची आहे. तेथे जास्त चेजेंस करता येत नाही. |
| श्री.अफसर खान | :सर्व शहरातील मिळकतीला टॅक्स लावावा. सर्व ठिकाणची वसुली करावी. सर्व ठिकाणी कामे करावी. |
| मा.उपमहापौर | :सर्व वार्डातील मिळकतीला टॅक्स लावावा. सिडको भागात बांधकाम करायचे असेल तर सिडकोची एनओसी घ्यावी लागते. कम्प्लीशनन घ्यावे लागते. टॅक्स आकारलेला आहे. जेथे तपासणीसाठी जातात. कागदपत्र मागतात. मनपाकडेही नोंदी असायला पाहिजे. पारीजातनगर भागात अपार्टमेंन्ट बिल्डरने ती घरे बांधली आहे. त्यांनी कम्प्लीशन घेतले नाही. त्याचा त्रास नागरीकांना होत आहे. अशा बिल्डरवर कार्यवाही केली पाहिजे. |
| श्रीमती सत्यभामा शिंदे | :ज्येष्ठ नागरीकांकडून टॅक्स भरून न घेता त्यांना परत पाठविले जाते. |
| मा.महापौर | :असे होऊ नये. कार्यवाही करावी. |
| श्री.भगवान घडमोडे | :सिडकोचे हस्तांतर झाले. त्यांना फक्त बांधकाम परवानगी साठी एनओसीची गरज आहे. डबल एनओसी ची गरज नाही. प्लॅनीग ॲथॉरिटी मनपाला आहे बांधकाम केल्यानंतर पुन्हा सिडकोची एनओसीची गरज नाही. |
| मा.आयुक्त | :या बाबत सिडको बरोबर चर्चा करून अंतिम कार्यवाही केली जाइल. |
| श्री.राजू शिंदे | :वार्ड-वाईज कार्यवाही करावी. सर्वांना टॅक्स लावावा. वॉर्ड क्र.-१ पासून सुरू करावे. कोणत्या इमारतीला टॅक्स लागला नाही? परवानगी आहे किंवा नाही याची माहिती मनपाकडे पाहिजे. |
| मा.महापौर | :टॅक्स वसुल झाला पाहिजे. नवीन घर असेल, बांधकाम चालू असेल, कर लावला पाहिजे. संपूर्ण शहरातील मिळकतीला टॅक्स लावावा. हा विषय मंजूर. |

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठण रोड वरील मा.खासदार श्री.राजकुमारजी धुत यांच्या घरासमोरील आनंदविहार लिटीलवुड शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यांचे कॉंक्रीटींग करण्याच्या कामाच्या रक्कम रुपये १,९९,८७,२९५/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७९:-** **(कार्यकारी अभियंता,प्रभाग क्र. ४,५,६,७,९)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०३, अंतर्गत विशाल मेगा मार्ट पासून ते मा.खासदार श्री.राजकुमारजी धुत यांच्या बंगल्यापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन २०१५-१६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,४९,७२,२८१/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावीत कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील पान क्र. GBR-Ward-D-Page No.02 वरील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग अ.क्र.१६ वर ठेवण्यात आलेल्या रक्कम रुपये १.५० कोटीच्या तरतुदीमधून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता, प्रस्तावित कामाचे रक्कम रुपये १,४९,७२,२८१/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०३, अंतर्गत विशाल मेगा मार्ट पासून ते मा.खासदार श्री.राजकुमारजी धुत यांच्या बंगल्यापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करण्याच्या कामाच्या रक्कम रुपये १,४९,७२,२८१/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८०:-** **(कार्यकारी अभियंता, प्रभाग क्रमांक-४,५,६,७,९)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९०, राजनगर अंतर्गत झेंडा चौक ते रेल्वेगेट क्र.५६ पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१५-१६ च्या दरसुची नुसार रक्कम रुपये ६८,५८,५३५/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ अंतर्गत **"नवीन डांबरी रस्ते शहरी भाग"** या लेखाशिर्षकामधुन करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये ६८,५८,५३५/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९०, राजनगर अंतर्गत झेंडा चौक ते रेल्वेगेट क्र.५६ पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या रक्कम रुपये ६८,५८,५३५/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८१:-**(विषय क्रमांक-७८१ व ७८२ यावर एकत्रित चर्चा करण्यात आली.) **(का.अभि., जलनि:सारण विशेष प्रकल्प)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपामार्फत केंद्र व राज्य शासन अनुदानातून व मनपाच्या सहभागातून औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत मुळ मंजुर प्रकल्प अहवालानूसार शहराच्या विविध भागात सिवेज ट्रीटमेंट प्लॉट बांधण्याचे नियोजन आहे. या अंतर्गत बनेवाडी येथे सुरूवातीला ३० द.लि.लि. क्षमतेचा सिवेज ट्रीटमेंट प्लॉट बांधण्याचे नियोजीत

होते. तथापि, या ठिकाणी महानगरपालिकेच्या मालकीची जी जागा आहे. त्या जागेवर अस्तित्वातील जुने जलनि:स्सारण पंप हाऊस व्यतिरीक्त सुमारे ९ कर्मचारी निवासस्थाने असल्याने तसेच या जागेतून १२ मीटर रुंद मंजुर विकास योजना रस्ता जात असल्याने उक्त क्षमतेचा सिवेज ट्रीटमेंट प्लॉट बांधणेस मर्यादा येत आहेत. त्यामुळे जागेच्यानुरूप या ठिकाणी बांधावयाच्या सिवेज ट्रीटमेंट प्लॉटची क्षमता कमी करून १० द.लि.लि. क्षमतेचा प्लॉट बांधण्याचे निश्चित केले आहे. त्यास्तव या परिसरात असलेली सर्व कर्मचारी निवासस्थाने व अस्तित्वात असलेले जुने नादुरूस्त सिवेज पंप हाऊस पुर्णत: पाडून नष्ट करणे आवश्यक आहे. जेणेकरून वर नमुद प्रमाणे १० द.लि.लि.क्षमतेचा सिवेज ट्रीटमेंट प्लॉट बांधण्यासाठी जागा उपलब्ध होऊ शकेल.

करीता, या परिसरात असलेली संपुर्ण कर्मचारी निवासस्थाने व जुने नादुरूस्त सिवेज पंप हाऊसचे पुर्णत: पाडकाम करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय क्रमांक ७८१, ७८२ वर सविस्तर चर्चा करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :विषय क्रमांक-७८१ मध्ये जुने पंप हाऊस असल्यामुळे एसटीपी बांधता येत नाही असे म्हटले. ३० द.लि.लि.क्षमतेचा सिवेज ट्रीटमेंट प्लॅन्ट बांधण्याचे नियोजीत असतांना या ठिकाणी बांधावयाच्या सिवेज ट्रीटमेंट प्लॅन्टची क्षमता कमी करून १० द.लि.लि. क्षमतेचा प्लॅन्ट बांधण्याचे निश्चित केले आहे. ज्या वेळेस डिपीआर तयार करण्यात आला होता. त्या वेळेस पीएमसीला तेथे निवासस्थाने आहेत, या बाबी निर्दशनास आल्या नाही का? या बदलामुळे इनलेट-आऊटलेट दोन्ही बदलणार आहे. क्षमता कमी केल्यामुळे इनलेट आऊटलेट दोन्ही पाईपचा डायमीटर चेंज होणे स्वाभाविकच आहे. दोन्ही बाजुंचा डायमीटर चेंज होणार आहे. त्यामुळे एकंदरीत या योजनेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. विषय क्रमांक ७८२ मध्ये सिध्दार्थ उद्यान परिसरातील एसटीपी रद्द करतो, त्याचे कारण म्हणजे सेन्ट्रल झु-ॲथॉरिटी ऑफ इंडिया यांनी याबाबतीत आक्षेप घेतलेला आहे. असे यात म्हटले. त्यामुळे डिपीआर तयार करतांना पीएमसीने हे बघायला पाहिजे होते. १०० एकरमध्ये सफारी पार्क तयार करणार आहे. त्यामुळे सदरील जागा रिक्त होणार आहे. आता त्या ठिकाणी झु-ॲथॉरिटीचा विषय येत नाही. कांचनवाडी येथील प्लॅन्टची क्षमता वाढवत आहे. त्यामुळे ज्या गोष्टींचे यामध्ये चेंजेस आहे त्या टेक्निकली योग्य असणार नाही. चिकलठाणा येथील एसटीपी रद्द करून झाल्टामध्ये घेत आहे. असे बदल डिपीआरमध्ये नसतांना का करत आहे? यात रिस्टोरेशनला किती खर्च येणार, तेही सांगीतलेले नाही. सहा एसटीपी प्लॅन्टचे चार एसटीपी प्लॅन्ट होतात. त्यामुळे फक्त ४२ लाख खर्चाची बचत होत आहे. हे योग्य आहे काय? पंपींग स्टेशनची २६ लक्ष रूपयांची बचत होत आहे. असे यात म्हटले आहे. रेल्वेच्या खालून लाईन टाकणे मार्गदर्शक तत्वानुसार देय होते. प्रस्तावात दिले. स्थानिक प्रशासनाने विरोध केला आहे. असे यात नमुद आहे. एखाद्या अधिकाऱ्याचा यास विरोध असु शकतो. हा प्रश्न दिल्ली दरबारी नेला असता, चर्चा केली असती तर ३.५० कोटी रूपये वाचले असते. यात पीएमसीने अक्षम्य दुर्लक्ष केले. त्यामुळे हा प्रश्न दिल्ली रेल्वेच्या सूचने नुसार अस्तित्वातील पुलाखाूलन वाहीनी न टाकता ती रेल्वे ट्रॅक खालुन टाकावी लागत असल्याने यासाठी ३.५० कोटी एवढा व रेल्वे विभागाचे सूचने

नूसार नव्याने करावा लागत आहे. रिस्ट्रोरेशनसाठी किती खर्च येणार याचा उल्लेख केलेला नाही. तसेच एमएस पाईप ऐवजी जीआरपी पाईपची तरतुद प्रकल्पात ठेवणे बाबत ज्या गोष्टीला जीवन प्राधिकरणाने मंजूरी दिलेली आहे. शासनाने मंजूरी दिलेली आहे असे यात नमुद केले आहे. पुढे असेही म्हटले आहे की, अशा गोष्टीला लोकल चर्चेच्या अंती हे चेंज करण्यात येत आहे. याबाबत कुठलीही शासनाची/केंद्र शासनाची परवानगी घेत नाही. हे कुठे तरी चुकत आहे पीएमसीचा अनुभव असाच आहे. असे यात दिले आहे. डीपीआर करतांना पीएमसीचा अनुभव कुठे होता? १६२६ मी.मी.व्यासाचा १२ एम.एम.जाडीचा पाईप डीपीआर मध्ये नाही. आणि याचा पुन्हा खर्च ३.०४ कोटी ॲडीशनल खर्च येणार आहे. काही ठिकाणी आर.सी.सी.मेन होल चेंबर बांधावे लागत असल्याने, तसेच काही ठिकाणी अत्यंत कमी रूंदीची जागा उपलब्ध असल्याने कमी व्यासाचे चेंबर बांधावे लागत आहे. असे नमुद केले. काही ठिकाणी जागेअभावी चेंबर बांधणे व लाईन टाकणे या बाबींवर १९.१० कोटी एवढा ॲडीशनल खर्च अपेक्षित आहे. यावर अतिरिक्त खर्च होण्याचा प्रश्न येत नाही कारण डायमीटर कमी होत आहे. Express Feeder व ॲटोमेशन करावे लागत असल्याने यासाठी ३.५९ कोटी एवढा अतिरिक्त खर्च लागत आहे. ऑलरेडी त्या ठिकाणी Express Feeder असतांना पुन्हा करण्याची आवश्यकता नाही. डिपीआरमध्ये त्याचा उल्लेख नाही. Existing Feeder मध्ये अपडेटेशन केल्यास एका कोटी रूपयांमध्ये हे काम झाले असते. पीएमसीने अतिरिक्त केलेला खर्च तपासावा लागेल. याबाबतीत ऑडिट पॉईंट निघणार आहे. त्यामुळे हे काम व्यवस्थित करायला पाहिजे. मुद्दा क्रमांक-७ मध्ये १५० टक्के पेक्षा अधिक वाढ झाली आहे. त्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. ही वाढ कुठे झाली त्याचा उल्लेख नाही. मोघम सांगीतलेले आहे. त्यामुळे यामध्ये भ्रष्ट्राचाराला वाव आहे. वाढ झाली असल्याने मा.सर्वसाधारण सभेच्या समोर मान्यतेसाठी आले आहे. अशी मोघम परवानगी सर्वसाधारण सभेने देवु नये. विस्तृत माहिती सर्वसाधारण सभेसमोर ठेवावे. विकास कामे करतांना चेंजेस होणार हे आम्हाला माहिती आहे. त्यास आमचा विरोध नाही. काम करत असतांना प्रत्यक्षात ग्राउंडवरची परीस्थीती वेगळी असु शकते. परंतु हे घेत असतांना असे मोघम घेवु नये असे मत आहे. थर्ड पार्टी इन्सेपेक्शनचा मुद्दा हा देखील गंभीर मुद्दा आहे. सरकारी अभियांत्रिकी महाविद्यालयाला थर्ड पार्टी इन्स्पेक्शन साठी केले आहे. परंतु यास जीवन प्राधिकरणाची मंजूरी नाही, ना शासनानी परवानगी दिली. अशा प्रकारची परवानगी नसतांना महानगरपालिका ७२ लाख रूपये खर्च कसे करू शकते. सरकारी अभियांत्रीकीचे काम करणारे हे स्ट्रक्चर इंजिनिअर हे काम करत आहे असे समजले आहे. ही बाब तपासण्याची गरज आहे. मुद्दा क्रमांक ९ मध्ये पीएमसीचे व्याजातुन तात्काळ पेमेंट देणे आहे. यास आमचा आक्षेप आहे. पीएमसीला पेमेंट देणेबाबत हरकत नाही. पीएमसीने काम केले की नाही याबाबतीतील ऑडीट केल्यानंतर त्यांचे पेमेंट दिले गेले पाहिजे. मुद्दा क्र.१०

RCC pipe Culverts हे ड्रेनेज लाईन टाकतांना तुटले व बदलावे लागणार असे म्हटले आहे. त्यासाठी ५५.०० लक्ष रक्कम अंतर्भुत करता येईल का? याचे स्वतंत्र इस्टिमेट तयार करायला पाहिजे होते. या योजनेमध्ये टाकता येणार नाही. शासनाची/केंद्र शासनाची परवानगी नाही. अशा पध्दतीने बदल करू शकतो का? काही ठिकाणी बांधकामे झालेली आहेत. ती चेंज करून २.९६ कोटी रूपये लागणार आहे असे म्हटले. डिझाईन करतांना ही बांधकामे दिसली नाही का? त्या वेळेस ही बांधकामे नव्हती का? नियोजन का करण्यात आले नाही. रायझींगमेल मध्ये एनपी २ च्या ऐवजी एनपी ३ पाईप वापरणार आहे. त्यामुळे १३.५२ कोटी रूपये अतिरिक्त खर्च येणार आहे. डिझाईन करतांना या गोष्टी आढळुन आल्या नाही का? यास शासनाच्या परवानगीची आवश्यकता नाही का? माती परीक्षण बरोबर केलेले नाही का? एकुण ३५.१६ कोटी रूपयांचा अतिरिक्त खर्च मनपावर टाकतो तसेच ७२.०० लक्ष इंजिनीयर कॉलेजचा खर्च येणार आहे. कुठल्याही गोष्टीला शासनाची परवानगी नाही. व्याज हे महानगरपालिकेच्या उत्पन्नातच पकडावे लागते. व्याजातून ही रक्कम देतो हे योग्य नाही.यामध्ये ज्या ज्या गोष्टींना शासनाची/केंद्र शासनाची परवानगीची आवश्यकता आहे ती घेतली गेली पाहीजे. या सर्व मुद्यांचा मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

श्री.राजु शिंदे :स.सदस्य यांनी सर्व मुद्यांचा खुलासा केलेला आहे. मा.आयुक्त यांनी त्यांचा खुलासा करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :मुद्यांचा सविस्तर खुलासा करण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल :एक एक मुद्यांवर खुलासा करण्यात यावा.

श्री.नंदकुमार घोडेले :प्रशासनाची भुमिका सभागृहासमोर सादर करावी.

श्रीमती माधुरी देशमुख :टर्न कि बेसीस म्हणजे काय? पान क्र.६ वर बनेवाडी संदर्भात मुळ निवीदा किंमत २.८ दिलेली आहे. सुधारीत किंमत १.९८ दिलेली आहे. वाढलेला खर्च दाखवलेला आहे. हे चुकीचे आहे. तसेच पेज क्रमांक-७ वर परिच्छेद-२ मध्ये महानगरपालिकेची आर्थीक परिस्थीती बरोबर नसल्याने महानगरपालिकेच्या खर्चाने लगेच जागा खरेदी करून ती कंत्राटदारास उपलब्ध करून देणे शक्य नाही. त्यामुळे महानगरपालिकेने तुर्त त्यांच्या खर्चाने जागा खरेदी करण्याची विनंती मनपाने करण्यात आली. खरेदी खत कुठे आहे? खरेदी कुठल्या रेटनी केलेले आहे? कोणाच्या नावाने खरेदी केले? हे सर्व मोघम दिलेले आहे. तात्काळ रक्कम देणे योग्य ठरते असे म्हटलेले आहे. आता महानगरपालिकेची आर्थीक परीस्थिती सुधारलेली आहे का? की लगेच रक्कम देवु शकतो?

श्रीमती शेख शमीना :व्याजावर महानगरपालिकेचा हक्क आहे का?

श्रीमती माधुरी देशमुख :चेंज ऑफ पॉलिसी करू शकतो का?

श्री.राजु शिंदे :यात म्हटलेले आहे की, महापालिकेला विनंती केली आहे. महापालिका म्हणजे मा.सर्वसाधारण सभा, प्रस्तावात आयुक्त म्हणुन संबोधायला पाहिजे होते. महापालिकेची कधी मान्यता घेतली? आणि प्रशासनाने केव्हा ठेवले होते? खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :सदर प्रोजेक्टची सुरूवात १ जुलै २०१४ आहे टार्गेट ३० जुन २०१७ आहे. या ३६ महिन्यांच्या काळात हा प्राजेक्ट कंम्प्लीट करायचा होता. डिपीआर प्रीप्रेशन केलेले होते. प्रोजेक्ट ३६५.६९ करोड रूपयांचा होता. ८० टक्के शेअर केंद्र शासनाचा १० टक्के राज्य शासन आणि १० टक्के महानगरपालिकेचा हिस्सा होता. युआयडीएसएसएमटी प्रोजेक्ट अमृतमध्ये झाला, त्यावेळी ६०:२०:२० अशा शेअर्समध्ये झालेला आहे. टेंडर झाले तेव्हा ३०.७८ टक्केमध्ये हा प्रोजेक्ट झाला होता. एकुण कॉस्ट ४६४ कोटी झालेली आहे. मुळ डिपीआरमध्ये सहा सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅन्ट होते. सिध्दार्थ गार्डन आणि सिडको या दोन भागामधील रद्द करण्यात आले होते. सिडको मध्ये चिकलठाणा एअरपोर्ट ॲथॉरिटीने अमान्य केले होते. तसेच सिध्दार्थ गार्डनमध्ये सेन्ट्रल झू-ॲथॉरिटी ऑफ इंडियाने आक्षेप घेतला होता. २१६ एमएलडीला प्राजेक्ट होता. यामध्ये कुठलाही फेरबदल करण्यात आलेला नाही. इतर चार एसटीपीमध्ये वाढवुन दिलेले आहे. बनेवाडी ३० एमएलडीचा १० एमएलडीचा केलेला आहे. कांचनवाडी १३६.५ चा होता तो वाढवुन १६१ एमएलडीचा केलेला आहे. झाल्टा येथील २० एमएलडीचा ३५ एमएलडी केलेला आहे. पडेगांव येथील १० एमएलडीचा होता तो १० एमएलडीचाच ठेवलेला आहे.

श्री.राजु शिंदे :जो बदल केला आहे, तो करता येतो का?

मा.आयुक्त :प्रत्यक्ष जागेवरील स्थितीनुसार बदल करावा लागणार आहे. शहराची डिमांड आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रत्यक्ष जागेवर समस्या येतात, तो करण्याबद्दल आक्षेप नाही. परंतु हे करत असतांना मा.स्थायी समिती सभा, मा.सर्वसाधारण सभेची, राज्य शासनाची परवानगी लागते का?

मा.आयुक्त :दोन बदल झालेले आहे. केंद्र शासनाने कळविले होते, त्या प्रमाणे पाठविलेले आहे, डिलिट केलेले आहे. राहिलेला विषय मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेचा तर यासाठी हया सभेमध्ये ठेवलेला आहे.

श्री.कैलास गायकवाड :सन-२०१४ ला प्रस्ताव मंजूर केलेला आहे. दोन अडीच वर्षाच्या काळात प्रशासनाला गरज का नाही वाटली? सभेची परवानगीची आवश्यकता आहे म्हणुन का आले नाही?

श्री.राजु शिंदे :पीएमसीने डिपीआर तयार करतांना सर्व बाबींचा अभ्यास करूनच डिपीआर सादर केला असेल. ६ एसटीपीचा प्लॅन विचारपुर्वक केला गेला असेल. त्याची क्षमता कमी जास्त करता येते का? इतर बाबींचे नियोजन केले आहे का? ३० एमएलडीची क्षमता असेल तर १० एमएलडी कसे करू शकतो. जर सर्वच पाणी एका ठिकाणी जाणार असेल तर एकाच ठिकाणी एसटीपी का केला नाही?

श्री.प्रमोद राठोड :एसटीपी प्लॅन्टच्या बदलामध्ये व खर्चामध्ये बदल होणार आहे. Per एमएलडी किती खर्च येतो. खर्च वाढल्यानंतर त्या ठिकाणचे नियोजन बघितलेले आहे का? अभ्यास केलेला आहे का? मुद्दा क्रमांक-७ मध्ये कार्योत्तर मंजूरी गृहित धरून हे सर्व बाबी केलेल्या आहे. ही योजना सन-२०१४ मध्ये आलेली आहे त्यावेळेस सभा कामकाज अस्तित्वात होते व आजही आहे. मग गृहीत

धरण्याची आवश्यकता काय होती? आम्ही या ठिकाणी उपलब्ध आहोत जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी या ठिकाणी आलेलो आहे. मागील सभांमध्ये संबंधीत अधिकारी यांनी या बदलाबाबत कोणतीही विचारणा केलेली नाही?

श्री.विकास एडके :सिध्दार्थ गार्डन येथील एसटीपी बनविण्यासाठी नॅशनल झु-ॲथॉरिटीने आक्षेप घेतलेला आहे. प्राणी संग्रहालय हे मिटमिटा येथे जमीन भेटलेली आहे. याचा खुलासा केलेला आहे का?

मा.महापौर :प्रशासनाला आपल्या मुद्यांची माहिती सभागृहाला दिल्यानंतर आपले प्रश्न विचारण्यात यावे.

मा.आयुक्त :सहा एसटीपीचे ४ एसटीपी केले. हा बदल हा आगामी शहराचा विचार करता केलेला आहे. २१६ एमएलडीचा जो प्लॅन्ट होता, तोच आहे. कांचनवाडीमध्ये १६१ एमएलडीचा एसटीपी वाढविण्यात आलेले आहे. तीन ठिकाणी रेडीरेकनर प्रमाणे जागा घेऊन प्रोजेक्ट करायचा होता. पडेगांव, पंपीग स्टेशन, बनेवाडी येथे ४० आर वॉर्ड क्र-९८ मध्ये ३ आर येथे ठेकेदाराने जमीन घेऊन काम सुरू केले होते.

श्री.राजु शिंदे :६ एसटीपी होते आता ४ एसटीपी करीत आहे. हा बदल करता येतो का? तसेच जो बदल केला. बदलाबाबत केव्हा लक्षात आले? १३६ एमएलडीचा १६१ कसा होवु शकतो?

मा.आयुक्त :होवु शकतो, नक्कीच करता येते.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्त,महोदय करता येते म्हणतात, तर ती प्रशासनाची जबाबदारी आहे.

श्री.भगवान घडमोडे :कशाच्या आधारे करता येते? खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :करत असतांना पुर्ण स्ट्रक्चरमध्ये बदल करावा लागतो.

मा.आयुक्त :जो पाण्याचा फ्लो येणार आहे त्यानुसार पाईप चेंज करावे लागणार आहे.

श्री.राजु शिंदे :स्ट्रक्चर चेंज कसे झाले? माझा आरोप आहे की, सगळ्या एसटीपी प्रशासनाकडुन चुकून मोठ्या झाल्या, म्हणुन बदल करण्यात आला.

श्री.रेणुकादास वैद्य :ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मा.आयुक्त हे करता येते, म्हणुन सांगतात. त्यास आमची हरकत नाही. जागा घेत असतांना त्याचे भाव कुणी ठरविले. मुख्य रस्त्यावरील रेडी रेकनरचे दर जास्त आहे. नाल्यामधील रेडीरेकनरचे दर कमी असल्यामुळे कमी भावामध्ये ते मिळाले पाहीजे होते. मा.आयुक्त महोदय हे प्रशासनाचे प्रमुख असल्यामुळे खालील अधिकाऱ्यांनी चुका केल्या असतील तर आपल्या हातामध्ये आज हा विषय आहे. त्यात सुधारणा करण्यास संधी आहे. याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर येणार आहे. जमीनीचा भाव ठरवला तो योग्य होता का?

श्री.राजु शिंदे :महानगरपालिकेची मान्यता केव्हा घेतली? विनंती केव्हा केली?

मा.महापौर :सभेसमोर विषय आलेला आहे मान्यता घेण्याबाबत सभेने ठरवावे. दुरूस्ती काय करायचे सुधारणा काय करायच्या हे ठरवावे.

श्री.राजु शिंदे :महानगरपालिकेने केव्हा विनंती केली, आम्हाला माहितच नव्हते.

मा.महापौर :प्रशासनाचे चुकले त्यावेळेस नाही घेतले, आता आपण निर्णय घ्यावा.

श्री.राजु शिंदे :प्रशासनाने विनंती केली, म्हणुन प्रस्तावात नमुद केले, ते चुकीचे आहे. केव्हा विनंती केली? सन-२०१४ मध्ये मनपाची परीस्थिती खराब होती. आता सन २०१६ मध्ये मनपाची परीस्थिती सुधारली आहे का? लगेच पैसे देण्याविषयी प्रस्तावात नमुद आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :डिपीआर तयार करण्यासंदर्भात पीएमसी नियुक्त केली होती. अंदाजे १० ते २० टक्के अंदाज चुकू शकतो. परंतु या ठिकाणी ८०० ते ९०० Quantity Extra झालेली आहे. त्यामुळे पीएमसीवर कोणती कारवाई केली. प्रत्यक्ष जागेवरील बदलानुसार प्रस्ताव ठेवलेला आहे. डिपीआर तयार करतांना त्यांची जबाबदारी काय?

श्री.भगवान घडमोडे :जल प्रक्रीयेसाठी प्रचलीत दराप्रमाणे जागा खरेदी केली, तर एकीकडे प्रशासन शिघ्र सिध्द गणकानुसार खरेदी केली म्हणुन म्हटलेले आहे म्हणजे नेमकी काय करायचे याबद्दल प्रशासन संभ्रमात आहे का? पैसे द्यायचे कोणते? खुलासा करण्यात यावा.

श्री.राजु शिंदे :जागा खरेदी केली, त्यावेळी मनपाला विचारले असेल किंवा नसेल सन २०१४ ला मनपाची परीस्थिती खराब होती. आता त्यांना पैसे द्यावे लागणार आहे. नवीन वर्षात जानेवारी मध्ये नवीन दरामध्ये त्यांना पैसे द्यावे लागणार आहे. संबधीताने व्यवहार करण्यासाठी वाढवुन द्या म्हणुन केलेले आहे का? पैसे देण्याची एवढी घाई का? मी प्रश्न केला होता त्यावेळी ९७ टक्के काम झाले असे म्हटले होते. असे असतांना हे वाढीव काम कसे आले?

मा.आयुक्त :Extra Item वाढलेले आहे २९.२ कोटी आहे. तीन मेन रिझन आहे. १ रेल्वे क्रॉसींग - रेल्वे क्रॉसींगच्या खालुन पाईप लाईन टाकायची होती परंतु सेफ्टी संदर्भात रेल्वे प्रशासनाने Horizentel Driling करून बाजुला क्रेसींग करून पाईप लाईन टाकायची आहे. असे म्हटले.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रस्तावात दिले की, स्थानिक पातळीवर प्रशासनाने त्याला विरोध केला आणि रेल्वेच्या मार्गदर्शक तत्वानुसार खालुन देणे अनुज्ञेय आहे. मग वरच्या Authority कडुन परवानगी का घेतली नाही. ३.५० कोटी रूपयांची बचत झाली असती.

मा.आयुक्त :रेल्वेने अमान्य केले होते. Horizontal Drilling करूनच करावे लागेल असे म्हटले आहे. चार ठिकाणची मान्यता मिळणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :आमच्या हरकतीचे मुद्दे मांडलेले आहे.

मा.आयुक्त :रायझींग मेलचा एम.एस.पाईप आणि जी.आरपी.पाईपचा इश्यु होता. एम.एस.पाईप कॉस्टली आहे. कांचनवाडीमध्ये २१६ एमएलडीचा जो फ्लो येणार आहे. त्यासाठी जीआरपी पाईप वापरल्यास रिपेरिंगमध्ये वेळ लागणार आहे तसेच तेवढे प्रेशर मेंन्टेंन करणार की नाही करणार? हा प्रश्न पडतो.

श्री.रेणुकादास वैद्य :डिपीआर डिझाईन करताना लक्षात नव्हते का?

मा.आयुक्त :डिपीआरमध्ये एमएस पाईप होते.

श्री.रेणुकादास वैद्य :जे पाईप बदलत आहोत त्यास शासनाची, जीवन प्राधिकरणाची मंजुरी आहे का?

| | |
|---|---|
| मा.आयुक्त | :ओरिजनल डिपीआरमध्ये एमएस पाईप होते. नंतर एमजीपी ने जीआरपी पाईप केले होते. ज्या ठिकाणी टेक्निकल प्रवाह वाढणार/फ्लो वाढणार आहे. त्या ठिकाणी एमएस पाईप बेटर राहणार आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :आपण टेक्निकली ओके म्हणतात, तर मग एमजीपीने नकार का दिला? शासनाने नकार दिला. मनपा प्रशासनाचे काम नव्हते का की, जीवन प्राधिकरणाला कनव्हेन्स् करणे. राज्य शासनाची परवानगी घेणे आहे. |
| मा.आयुक्त | :एमएस पाईपच टेक्निकली बेटर आहे. पंपीग स्टेशन येथे एक्सपेस मीटर व ॲटोमेशनचा इश्यु होता. या ठिकाणी ३.९ करोडचा जास्तीचा झालेला आहे. पुर्वी कंन्सीडर केले नव्हते. क्रॉस ३८ मध्ये १५०/ च्या above जाते अगोदर कंत्राटदाराचे म्हणने होते की, मी करंट डिएसआरमध्ये काम करणार नाही. As per norms dsr rate कमी झाला असेल तरी त्याला नवीन डिएसआर मध्येच काम करावे लागेल. टेंडर क्लॉजमध्ये आहे ते त्याला करावे लागेल. ज्या ठिकाणी एनपी २ आणि एनपी ३ चा इश्यु आहे. एनपी २ मध्ये बचत झालेली आहे. एनपी ३ मध्ये वाढ झालेली आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :पीएमसी कशासाठी नियुक्त केली. थर्ड पार्टी इन्स्पेक्शनसाठी शासकीय अभियांत्रिकीचे नांव डिपीआर देत असतांना दिले होते. राज्य शासन आणि जीवन प्राधिकरणाने रिजेक्शन केल्यानंतरही त्याला दिले. म्हणजे शासनाचे आदेश पायदळी तुडवतो का? तसेच अभियांत्रिकी कॉलेजला ७२ लाख रूपये देत असतांना त्या कॉलेजच्या कोणत्या विभागाच्या इंजिनिअरकडुन हे काम केले जाते. याचा खुलासा करण्यात यावा. |
| मा.आयुक्त | :टेक्निकल खुलासा संबंधीत कार्यकारी अभियंता हे देतील. |
| श्रीमती शेख समीना | :व्याजावर मनपाचा हक्क आहे का? व्याजाची रक्कम वापरण्यासाठी शासनाच्या परवानगीची आवश्यकता नाही का? |
| कार्यकारी अभियंता(ड्रे) | :२७ मे २०१६ रोज शासनाने लिबर्टी दिलेली आहे की, एक्स्ट्रा निधी या प्रोजेक्टसाठी लागतो तो खर्च करण्याचा अनुज्ञेय आहे. |
| श्री.राजु शिंदे | :व्याजाची रक्कम कशासाठी खर्च करायची हे प्रशासनाला ठरविण्याचा अधिकार नाही. व्याजाच्या रक्कमेबाबत मा.सर्वसाधारण सभा निर्णय घेईल. |
| मा.महापौर | :व्याजाच्या रक्कमेबाबत प्रशासन काय करणार याबाबत सभेसमोर माडण्यात यावे. |
| श्री.राजु शिंदे | :जमीनीबाबत खुलासा करण्यात यावा. कुठल्या दराने देणार आहे खुलासा करण्यात यावा. डिसेंबर पर्यंत पैसे नाही दिल्यास नविन दराने रेट लागेल. असे दिले. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :पान क्रमांक ७ वर जागा खरेदीची विनंती कंत्राटदार यांना केली होती. नंतर जागा संबंधीताची राहणार की, मनपाची? करारनाम्याची प्रत देण्यात यावी. |
| कार्यकारी अभियंता(ड्रे) | :तीन ठिकाणची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नव्हती. पब्लीक नोटीस इश्यु केली होती. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :जागाच ताब्यात नव्हती तर पीएमसीने नियोजन कसे केले? |

श्री.अफसर खान :डिपीआर घरी बसुन तयार करण्यात आलेला आहे. यामध्ये चुक झालेली आहे. सभागृहाची तसेच आयुक्तांची दिशाभुल करीत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :दिशाभुल करीत आहे, याबाबत मा.आयुक्तांनी लक्ष द्यावे. पीएमसीला रक्कम देण्याची काही आवश्यकता नाही. प्रस्तावात ९७ टक्के काम झाल्याचे म्हटलेले आहे. आज जवळपास ४० टक्के काम बाकी असतांना पीएमसीचे देयक काढण्याची एवढी घाई का करण्यात येते? मा.आयुक्तांना वाटेल की काम समाधानकारक केलेले आहे, त्या वेळेस पेमेंट देण्यात यावे.

श्री.भगवान घडमोडे :पीएमसीने अनेक चुका केलेल्या आहेत. प्रत्येक गोष्टींमध्ये चुका केलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना पैसे देण्याची आवश्यकता काय? रेडीरेकनर आणि प्रचलीत दर म्हणजे कोणत्या दराने द्यायचे हे ठरवत नाही. पीएमसीने चुका केलेल्या आहेत.

श्री.अफसर खान :दिशाभुल प्रस्ताव सभागृहापुढे ठेवलेला आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :पीएमसीवर कोणती कारवाई करणार?

श्री.भगवान घडमोडे :एक्स्ट्रा एटमवर कुठे कुठे खर्च केलेला आहे? कोणता चेंजेस् केला? हे ही दाखवलेले नाही. म्हणजे यामध्ये भ्रष्टाचाराला जागा आहे.

श्रीमती शेख समीना :पीएमसीचे ऑडीट करण्यात यावे त्यात चुका झाल्या असतील तर ते त्यांचेकडुन भरून घेण्यात यावे.

मा.आयुक्त :प्रत्यक्ष स्थळी काम करत असतांना काही अडचणी येत असतात. त्याप्रमाणात बदल करावे लागतात. ते मान्य आहे परंतु ज्या ठिकाणी व्हेरीएशन जास्त आहे. कुठल्याही ठिकाणी डिझाईन, स्ट्रक्चरमध्ये, टेक्निकलमध्ये जास्त व्हेरीएशन झाले असेल तर १०० टक्के त्या पीएमसीवर नियमानुसार कार्यवाही करणार आहे.

श्री.राजु शिंदे :काम चांगले झाले असेल, तर पीएमसीला रक्कम देण्यात यावी.

मा.आयुक्त :स्वतंत्ररीत्या तपासणी करण्यात येणार आहे. त्यानंतर पेमेंट करण्यात येणार आहे.

श्री.राजु शिंदे :आयुक्तांचे समाधान झाल्याशिवाय एजन्सी पीएमसीला पेमेंट देण्यात येऊ नये.

श्री.राजगौरव वानखेडे :सदरील विषय मा.स्थायी समिती सभेमध्ये येणे आवश्यक होता तो आलेला नाही. पीएमसीचा मागचा अनुभव वाईट आहे. पीएमसीला रक्कम देण्याबाबत प्रस्तावात आहे. २७ मे २०१६ चा निर्णय काय आहे. व्याज एकुण किती जमा झालेले आहे.

कार्यकारी अभियंता(ड्रे) :४० कोटी रूपये व्याज जमा झालेले आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :अंतर्गत वाहीनी टाकण्याबाबत नियोजन आहे का?

श्रीमती किर्ती शिंदे :भुमिगत गटार योजनेचे काम अतिक्रमणामुळे थांबले असे वृत्तपत्रांमध्ये आलेले आहे हे खरे आहे का?

मा.आयुक्त :एकुण १४ ठिकाणी अतिक्रमण होते ११ प्रकरणांचा निपटारा केलेला आहे इतर स्टेप बाय स्टेप कार्यवाही करण्यात येत आहे.

श्रीमती किर्ती शिंदे :डिपीआर तयार करतांना या बाबींचा विचार केला नव्हता का?

मा.आयुक्त :नैसर्गिक प्रवाहानुसार काम करावे लागणार आहे.

श्री.राजु शिंदे :बदल करतांना नैसर्गिक प्रवाह तेव्हा पाहिला नाही का? एक एसटीपी ३० वरून १० करण्यात येतो.

मा.आयुक्त :मा.सर्वसाधारण सभा सर्वोच्च सभागृह आहे. येथे सर्वांचे प्रतिनिधीत्व आहेत.

श्री.राजु शिंदे :अंतर्गत ड्रेनेज वाहीनीचे काम केव्हा केले जाणार आहे. खुलासा करण्यात यावा. अंतर्गत वाहीनीचे जो पर्यंत काम केले जात नाही, तो पर्यंत हा प्रोजेक्ट सक्सेस होणार नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :सदरील विषय मा.स्थायी समिती सभेमध्ये येणे आवश्यक होता.

मा.महापौर :सर्व स.सदस्यांनी याबाबत चर्चा केलेली आहे. प्रशासनाने टेक्निकल बाबींचा खुलासा केलेला आहे. स.सदस्यांच्या मतानुसार यात महानगरपालिकेचे कुठलेही नुकसान होऊ नये, या भावनेनुसार सर्वांनी आपआपले मते मांडलेली आहेत. स.सदस्यांनी मांडलेल्या भावनेची नोंद यात घेण्यात यावी. पीएमसीने बदलेल्या डिझायन बाबत माहीती घेण्यात यावी. व्याजाच्या रक्कमेतुन मनपाच्या निधीतून स.सदस्यांच्या वार्डात एक किलोमीटर ड्रेनेज वाहीनी झाली पाहीजे. अशी भुमीका सदस्यांची आहे. अंतर्गत वाहीनी झाली नसल्यामुळे मुख्य वाहीनींचा उपयोग होणार नाही. प्रत्येक वार्डात किमान एक कि.मी. ड्रेनेज वाहीनी करण्यात यावी. सर्व स.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपामार्फत केंद्र व राज्य शासन अनुदानातून व मनपाच्या सहभागातून औरंगाबाद शहरात भुमीगत गटार योजने अंतर्गत बनेवाडी येथे ३० द.लि.लि. क्षमतेचा सिवेज ट्रीटमेंट प्लॉट बांधण्याचे नियोजीत होते. तथापि, जागेच्यानुरूप या ठिकाणी बांधावयाच्या सिवेज ट्रीटमेंट प्लॉटची क्षमता कमी करून १० द.लि.लि.क्षमतेचा सिवेज ट्रीटमेंट प्लॉट बांधण्यासाठी उपलब्ध असलेल्या परिसरात संपुर्ण कर्मचारी निवासस्थाने व जुने नादुरूस्त सिवेज पंप हाऊसचे पुर्णतः पाडकाम करण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८२:-** **(विषय क्रमांक ७८१ व ७८२ वर एकत्रित चर्चा करण्यात आली.)** **(कार्य. अभि. जलनि:सारण विशेष प्रकल्प)**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, केंद्र व राज्य शासन अनुदानातून शहरातील विविध भागात मल-जल प्रक्रीया केंद्र बांधणे व मलनि:सारण वाहीन्या टाकणे करीता रक्कम रु. ३६५.६९ कोटीचा प्रकल्प प्रस्ताव राज्य शासनामार्फत लहान व मध्यम शहराच्या पायाभुत सोयी सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडे मंजुरीस्तव सादर करण्यात आलेला होता. सदरील प्रस्तावास केंद्र शासनाने शहरी विकास मंत्रालयाचे पत्र क्रमांक/के/१४०११/१५/२०१३-युडी-१ दिनांक २४ डिसेंबर २०१३ च्या Office Memorandum नूसार मंजुरी प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पासाठी रितसर निविदा कार्यवाही अंती मा.स्थायी समिती ठराव क्रमांक-२३१ दिनांक २९.४.२०१४ च्या मंजुरी अन्वये मे.खिलारी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. आणि घारपुरे इंजिनिअरींग ॲण्ड कन्स्ट्रक्शन प्रा.लि. (जे.व्ही.) यांना मुळ अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.७८% जास्त दराने (योजनेची दरसूची सन २०१२-१३ नूसार ) काम प्रदान करण्यात आले आहे. निविदा अंतिम करण्याचे वेळी लागू असलेली दरसूची सन २०१३-१४ नुसार तुलना केली असता हे दर अ.प.दरापेक्षा केवळ २.१८% एवढे जास्त आहेत.

१) स्थायी समीतीच्या ठराव क्रमांक २३१ दिनांक २९.०४.२०१४ च्या मंजुरी नूसार या योजने अंतर्गत
(I) कांचनवाडी मल-जल प्रक्रीया केंद्र (STP) १६१ द.ल.लि.प्रति दिन क्षमता.
(II) झाल्टा मल-जल प्रक्रीया केंद्र (STP) ३५ द.ल.लि.प्रति दिन क्षमता आणि
(III) पडेगाव मल-जल प्रक्रीया केंद्र (STP) १० द.ल.लि.प्रति दिन क्षमता, या तीन STP चे काम प्रगतीपथावर आहे. तसेच बनेवाडी येथे १० द.ल.लि.प्रती दिन क्षमतेचा प्रकल्प उभारण्याचे भविष्यातील नियोजन आहे. अशा प्रकारे एकुण सर्व मल-जल प्रक्रीया केंद्रांची (STP) ची क्षमता २१६ द.ल.लि.प्रति दिन एवढी होत आहे. पुर्व नियोजना नूसार
(अ) कांचनवाडी येथे १३६.५० द.ल.लि.प्रती दिन, (ब) बनेवाडी ३० द.ल.लि. प्रती दिन, (क) पडेगाव १० द.ल.लि. प्रती दिन, (ड) सिध्दार्थ उद्यान ४.५० द.ल.लि. प्रती दिन (इ) झाल्टा २० द.ल.लि. प्रती दिन व (ई) सिडको विमानतळाजवळ १५ द.ल.लि.प्रती दिन अशी एकुण २१६ द.ल.लि. प्रती दिन एवढया क्षमतेचे STP बांधण्याचे नियोजन होते.

सिध्दार्थ उद्यान परिसरात सेन्ट्रल झू ॲथॉरिटी ऑफ इंडिया यांनी मंजूर केलेल्या मास्टरप्लॅन नूसार प्राणी संग्रहालय विकसीत करण्याचे नियोजन संचालक, प्राणी संग्रहालय मनपा औरंगाबाद यांच्या कडून प्रस्तावित असल्याने व दरम्यानच्या काळात सेन्ट्रल झू ॲथॉरिटी ऑफ इंडिया यांच्या पथकाची पाहणी झाल्यानंतर, सदर पथकाने सिध्दार्थ उदयान परिसरात मल-जल प्रक्रीया केंद्र (STP) बांधणे बाबत आक्षेप घेतला. त्यामुळे या ठिकाणी ४.५० द.ल.लि. प्रती दिन क्षमतेचे मल-जल प्रक्रीया केंद्र (STP) बांधण्याचे नियोजन रद्द करावे लागले.

बनेवाडी येथील ३० द.ल.लि. प्रती दिन क्षमतेच्या मल-जल प्रक्रीया केंद्रासाठी पुरेशी जागा (सुमारे ३ एकर) उपलब्ध होत नसल्याने, तसेच सदरचा STP हा दरम्यानचा (Intermediate) STP असल्याने बनेवाडी येथील सिवेज ट्रीटमेंट प्लांटची मल जल शुध्दीकरण प्रक्रीया क्षमता कमी करुन ती १० द.ल.लि.प्रती दिन करण्यात आली आहे. त्यामुळे जागे अभावी बनेवाडीच्या मल-जल प्रक्रीया केंद्राची (फरकाची) २० द.ल.लि.प्रती दिन एवढी क्षमता बनेवाडी व कांचनवाडी प्रकल्प एकाच मार्गावर आणि एकाच बेसिनवर असल्याने कांचनवाडी येथील मल-जल प्रक्रीया केंद्रामध्ये वाढविण्यात आली आहे. त्यामुळे फेर नियोजना नूसार कांचनवाडी प्रकल्पाची क्षमता १३६.५० द.ल.ली.प्रती दिन ऐवजी (१३६.५०+४.५०+२०.००) १६१ द.ल.लि.प्रती दिन एवढी करण्यात आली आहे.

सिडको परिसरातील सिवेज ट्रीटमेंट प्लांट भविष्यात चिकलठाणा विमानतळाचे विस्तारीकरण होणार असल्याने तसेच एअर पोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडिया यांचा सिडको परिसरातील सिवेज ट्रीटमेंट प्लांट उभारणी करणे बद्दल आक्षेप असल्याने त्यांचा आक्षेप विचारात घेता तसेच झाल्टा येथील नियोजित २० द.ल.लि. प्रती दिन क्षमतेचे मल-जल प्रक्रीया केंद्र (STP) देखील याच मार्गावर आणि एकाच बेसिनवर असल्याने, चिकलठाणा विमानतळाजवळील नियोजित १५ द.ल.लि. प्रति दिन क्षमतेच्या मल-जल प्रक्रीया केंद्राची (STP) क्षमता, झाल्टा STP प्रकल्पात वाढवून ती ३५ द.ल.लि.प्रति दिन करण्यात आली आहे. या मल-जल प्रक्रीया केंद्र (STP) च्या प्रकल्पाच्या क्षमता बदलास आयुक्त स्तरावरील प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. पूर्व मान्यते नूसार नक्षत्रवाडी, बनेवाडी,सिध्दार्थ उद्यान,पडेगाव,झाल्टा व सिडको भागातील विमानतळाजवळ या प्रमाणे ६ ठिकाणी सिवेज ट्रीटमेंट प्लॅट बांधण्याचे नियोजन होते. मात्र वर उल्लेख केल्यानूसार सिध्दार्थ उद्यान परिसरातील ४.५ द.ल.लि.क्षमतेचा STP व सिडको विमानतळा जवळील प्रस्तावीत STP रद्द करण्यात आल्याने याची निविदेतील रक्कम अनुक्रमे रु.३.३६ कोटी व रु.८.१५ कोटी अशी एकुण रु.११.५१ कोटी एवढी प्रकल्पात प्रथम दर्शनी बचत झाली आहे. तथापी या रद्द झालेल्या STP ची

क्षमता कांचनवाडी येथील STP मध्ये व सिडको भागातील रद्द झालेल्या STP ची क्षमता व झाल्टा येथील STP मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. मुळ निविदे नूसार STP बांधण्यासाठी रु.१०४.३४ कोटी एवढी तरतुद करण्यात आलेली होती. परंतू वर उल्लेख केल्यानूसार आवश्यक कारणांमुळे STP बांधण्याच्या नियोजनात बदल झाला असून त्यायोगे दुरुस्त रक्कम काढली असता ती रु.१०३.९२ कोटी एवढी येत असून या मध्ये रु.४२.०० लक्ष (DPR नुसार) एवढी बचत होत आहे. शासन निर्देशानुसार या योजनेतील STP साठी ओपन टेक्नॉलॉजीवर आधारीत निवीदा मागविण्यात आली होती. त्यामध्ये पात्र ठरलेल्या मे. खिल्लारी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. यांनी अत्याधुनिक एस बी आर टेक्नॉलॉजीवर आधारीत निविदा भरली व त्यासाठी त्यांनी या प्रकल्पातील एस.टी.पी. या उपांगासाठी रुपये १५५.६९ कोटीची निविदा Turn Key basis वर (७.३१ % रीबेटनंतर) निविदा मान्य करण्यात आली आहे. आता या प्रस्तावात नमुद प्रमाणे सहा एस.टी.पी ऐवजी तेवढयाच क्षमतेचे ०४ एसटीपी बांधण्याचे नियोजन असल्याने त्यानुसार या ०४ एसटीपीची सुधारीत किंमत काढली असता ती रुपये १५४.४३ कोटी एवढी होत असुन त्याव्दारे प्रत्यक्षात रुपये १.२५ कोटीची बचत STP या योजनेच्या उपांगात होत आहे. या झालेल्या बदलाचा थोडक्यात तपशिल खालील तक्त्यात नमूद प्रमाणे आहे.

(रु.कोटी मध्ये)

| अ.क्र | STP नाव | मुळ निविदे नूसार किंमत | दुरुस्ती नंतर येणारी किंमत | झालेली बचत | वाढलेला खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नक्षत्रवाडी-१६१. द.ल.ली. | रु.६१.९२ | रु.७२.४४ | -- | रु.१०.५२ | सिध्दार्थ उद्यान परिसरातील STP सेन्ट्रल झु ऑथोरिटीने हरकत घेतल्याने रद्द करण्यात आला तसेच बनेवाडी येथे जागा कमी असल्याने या STPची क्षमता नक्षत्रवाडी STP मध्ये वाढविली. तसेच विमानतळ प्राधिकरणाने हरकत घेतल्याने येथील STP रद्द करण्यात येऊन त्याची क्षमता झाल्टा STP मध्ये वाढविण्यात आली |
| २ | बनेवाडी १०द.ल.ली. | रु. १३.९३ | रु.६.४४ | रु.७.४९ | -- | |
| ३ | सिध्दार्थ उद्यान ४.५०द.ल.ली. | रु. ३.३६ | -- | रु. ३.३६ | -- | |
| ४ | पडेगाव १०द.ल.ली. | रु.६.६३ | रु.६.४४ | रु.०.१९ | -- | |
| ५ | झाल्टा ३५द.ल.ली. | रु.१०.३३ | रु.१८.५९ | -- | रु.८.२६ | |
| ६ | विमानतळ परिसराजवळ १५द.ल.ली. | रु.८.१५ | -- | रु.८.१५ | -- | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | आहे. असे असले तरी STP साठी लागणाऱ्या खर्चात रुपये ४२ लक्ष बचत होत आहे. |
| | एकुण | रु.१०४.३४ | रु.१०३.९१ | रु.१९.१९ | रु.१८.७८ | |

मुळ निविदे नुसार ६ ठिकाणी सिवेज पंपींग स्टेशन प्रस्तावीत होते. त्यातील सिध्दार्थ उद्यान परिसरातील सिवेज पंपींग स्टेशन सेंट्रल झु ॲथोरिटीने आक्षेप घेतल्याने रद्द करण्यात आला असून तसेच सिडको परिसरातील सिवेज पंपींग स्टेशन वर उल्लेख केल्यानूसार एअर पोर्ट ॲथोरिटीने आक्षेप घेतल्याने रद्द करण्यात आला. त्यामुळे गोलवाडी, बनेवाडी व झाल्टा आणि जुना वार्ड क्र ९८ येथील सिवेज पंपींग स्टेशनच्या क्षमतेमध्ये जागेनूसार बदल करण्यात आले. या बदलाचा तपशील खालील नमूद प्रमाणे आहे.

| अ.क्र | सिवेज पंपींग स्टेशनचे स्थळ | मुळ निविदे नूसार किंमत | सुधारीत प्रमाणे किंमत | झालेली बचत | वाढलेला खर्च | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोलवाडी | रु.११.४४ | रु.१२.१५ | -- | रु. ०.७१ | मुळ तरतुदीत बदल करुन ०५ ठिकाणी सिवेज पंपींग स्टेशन बांधण्यात येत असल्याने यामध्ये सुमारे रुपये २६ लक्ष एवढी बचत होत आहे. |
| २ | बनेवाडी | रु.२.०८ | रु.१.९८ | -- | रु.०.१० | |
| ३ | सिध्दार्थ गार्डन | रु.०.६६ | -- | ०.६६ | -- | |
| ४ | पडेगाव | रु.१.५२ | रु.२.०४ | -- | रु.०.५२ | |
| ५ | झाल्टा | रु.२.५३ | रु.३.०५ | -- | रु.०.५२ | |
| ६ | सिडको | रु.१.९१ | -- | रु.१.९१ | -- | |
| ७ | वार्ड क्र ९८ | रु.१.०४ | रु.१.७० | -- | रु. ०.६६ | |
| | **एकुण** | **रु. २१.१८** | **रु.२०.९२** | **रु.२.६७** | **रु. २.४१** | |

वर उल्लेख केल्यानूसार पुर्वीच्या नियोजित ६ ठिकाणांऐवजी चार ठिकाणी मल-जल प्रक्रीया केंद्र (STP) प्रस्तावित करण्यात आले असले तरी, प्रकल्पाची एकुण मल-जल प्रक्रीया केंद्र (STP) क्षमता कमी होत नसून ती पूर्वी प्रमाणेच २१६ द.ल.लि. प्रति दिन एवढीच ठेवण्यात आलेली आहे. तसेच या बदलामुळे मंजुर निविदा रकमेच्या खर्चात कोणतीही वाढ होत नाही. सदर प्रकल्प नियोजित कालावधीत पूर्ण व्हावा म्हणून नगर परिषद संचालनालय व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मान्यतेच्या अधिन राहून कामे सुरु ठेवली आहेत. प्रकरणी नगर परिषद संचालनालय व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मान्यते नूसार STP च्या बांधकाम खर्चाच्या बाबतीत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

२) या प्रकल्पासाठी निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे मल-जल प्रक्रीया केंद्र (STP),तसेच सिवेज पंपींग स्टेशन (SPS) चे बांधकाम करण्यासाठी मनपाच्या मालकीची जागा उपलब्ध करुन देणे, ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. (१)कांचनवाडी मल-जल प्रक्रीया केंद्र (STP) आणि (२) झाल्टा मल-जल प्रक्रीया केंद्रासाठी (STP) महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा उपलब्ध असल्याने, त्या

जागा कंत्राटदारास बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. मात्र निविदेतील पूर्व नियोजना नूसार पडेगाव येथील मल-जल प्रक्रीया केंद्र (STP) व सिवेज पंपींग स्टेशन (SPS) तसेच गोलवाडी सिवेज पंपिंग स्टेशन (SPS) आणि पूर्वीचा वार्ड क्र ९८ (वळदगाव शिवार) येथील सिवेज पंपींग स्टेशन बांधणेसाठी महानगरपालिकेची स्वतःच्या मालकीची जागा उपलब्ध नव्हती. तसेच महानगरपालिकेची सद्या आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने महानगरपालिकेच्या खर्चाने लगेचच जागा खरेदी करुन ती कंत्राटदारास उपलब्ध करुन देणे शक्य नव्हते. त्यामुळे महानगरपालिकेचा सदर महत्वाकांक्षी प्रकल्प विहीत कालावधीत पुर्ण होण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाचे कंत्राटदार यांना तुर्त त्यांच्या खर्चाने जागा खरेदी करण्याची विनंती महानगरपालिकेतर्फे करण्यात आली होती. त्यानूसार प्रकल्पाचे कंत्राटदार यांनी महानगरपालिकेच्या विनंती नूसार पडेगाव, (गट नं.१३/३ क्षेत्रफळ ४० आर.) गोलवाडी (गट नं.८० क्षेत्रफळ ४०आर) आणि पूर्वीचा वार्ड क्र ९८ (वळदगाव शिवार-गट नंबर ६२ क्षेत्रफळ ३ आर) येथे उभारावयाच्या मल-जल प्रक्रीया केंद्रासाठी व सिवेज पंपींग स्टेशनसाठी खुल्या बाजारातील प्रचलित दराने जागा खरेदी केल्या आहेत आणि सदर जागेवर प्रकल्पाची बांधकामे प्रगतीपथावर आहेत.

अशा प्रकारे महानगरपालिकेच्या नियोजित प्रकल्पातील पंपींग स्टेशन आणि मल-जल प्रकल्पा करीता या प्रकल्पाचे कंत्राटदार मे.खिलारी इन्फ्रा.प्रा.लि.यांनी खरेदी केलेल्या जागेचा मोबदला महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिसूचना दिनांक २२ मे २०१४ नूसार मे.खिलारी इन्फ्रा.प्रा.लि. यांना देणे बाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. त्यानूसार सिद्ध शिघ्र गणक दरा (R.R.) नूसार मोबदल्याची रक्कम मे.खिलारी इन्फ्रा.प्रा.लि. यांना देणे बाबत आयुक्त स्तरावरील प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. शासन परिपत्रक क्रमांक :संकीर्ण-३४१६/प्र.क्र.४०/नवि-०४ दिनांक २७ मे २०१६ नूसार या योजनेसाठी शासनाकडून प्राप्त अनुदानाच्या रक्कमेवर जमा होणाऱ्या व्याजाच्या रक्कमेतून सदर खर्च भागविणे अनुज्ञेय करण्यात आले आहे. या शासन परिपत्रकानुसार पडेगाव येथे एसटीपी साठीची जागा, गोलवाडी पंपींग स्टेशनची जागा व पुर्वीचा वार्ड क्र.९८ (वळदगाव शिवार) ची जागा या इत्यादी जागेचा मोबदला कंत्राटदार यांना त्यांनी ज्या सिध्द शिघ्र गणक दरानूसार आजमितीस खरेदी केली आहे. त्या दराने त्यांना तात्काळ रक्कम अदा करणे, योग्य वाटते. कारण शासनाकडून जाहीर होणारे दर हे जानेवारी ते डिसेंबर या कालावधीपर्यंत त्या त्या वर्षात लागू असतात त्यामुळे सदर दरामध्ये वाढ होण्यापूर्वी म्हणजेच सन २०१६ च्या वर्ष अखेरी पर्यंत कंत्राटदारास त्यांनी मनपासाठी खरेदी केलेल्या जागेचा मोबदला देणे योग्य वाटते. ज्यामुळे मनपास जास्तीचा अर्थिक भार सोसावा लागणार नाही. सदर भुसंपादनाचा मोबदला कंत्राटदार यांना शासन परिपत्रक क्रमांक :संकीर्ण-३४१६/प्र.क्र.४०/नवि-०४ दिनांक २७ मे २०१६ नूसार या योजनेसाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाच्या रक्कमेवर जमा होणाऱ्या व्याजाच्या रक्कमेतून अदा करणेस अनुज्ञेय करण्यात आले आहे. करीता सदर बाब मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

३) या योजनेअंतर्गत पूर्व नियोजना नूसार व सविस्तर प्रकल्प अहवालानूसार (DPR) रेल्वे पुलाच्या खालून पाच ठिकाणी जलनिःस्सारण वाहीनी टाकण्याचे नियोजन होते, त्यामुळे पुर्वी अस्तित्वात असलेल्या जलनिःसारण वाहीनीच्या ठिकाणी जुनी नादुरुस्त जलनिःसारण वाहीनी काढुन त्याठिकाणी नविन अधिक व्यासाची जलनिःसारण वाहीनी टाकण्याचे प्रयोजन होते. मात्र याबाबत रेल्वे खात्याशी पत्र व्यवहार केला असता रेल्वेखात्याने कळविले की, त्यांच्या विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनूसार रेल्वे पुलाच्या खालून जलनिःस्सारण वाहीनी टाकणे देय आहे. मात्र स्थानिक रेल्वे कार्यालयाने

सुरक्षिततेच्या कारणास्तव रेल्वे पुला खालून खोदकाम करुन जलनि:स्सारण वाहीनी टाकण्यास प्रतिबंध केल्याने रेल्वे पुलाच्या खालून जलनि:स्सारण वाहीनी टाकणे ऐवजी रेल्वे लाईनच्या खालून (Below Track) Trench less टेक्नोलॉजी द्वारे जलनि:स्सारण वाहीनी टाकावी लागणार आहे. त्यासाठी रेल्वे खात्याने Way leave charges तसेच Planning & Design charges म्हणून एकुण रु. ६४.६१ लक्षचा भरणा सिनिअर मॅनेजर, सिनिअर डिव्हीजन दक्षिण मध्य रेल्वे नांदेड यांच्या नावे करणे बाबत पत्र दिले होते. त्या नूसार सदर रक्कम रु. ६४.६१ लक्ष चा भरणा रेल्वे खात्याकडे करण्यात आला आहे. या शिवाय रेल्वेच्या सूचने नूसार अस्तित्वातील पुलाखालून जलनि:स्सारण वाहीनी न टाकता ती रेल्वे ट्रॅक खालुन Trenchless Technology द्वारे टाकावी लागत असल्याने या साठी रु.३.५० कोटी एवढा व वरील परिच्छेदात नमूद रु. ६४.६१ लक्ष असा एकुण रु.४.१४ कोटीचा खर्च रेल्वे विभागाचे सूचने नूसार नव्याने करावा लागत आहे. तथापी हा योजनाबाहय अतिरिक्त खर्च शासन परिपत्रक क्रमांक :संकीर्ण-३४१६/प्र.क्र.४०/नवि-०४ दिनांक २७ मे २०१६ नूसार या योजनेसाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाच्या रक्कमेवर जमा होणाऱ्या व्याजाच्या रक्कमेतून अदा करणेस अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यामुळे या आकस्मिक खर्चाचा कोणताही अतिरिक्त भार महानगरपालिकेवर येणार नाही तथापी या खर्चासाठी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता होणेसाठी प्रस्ताव सादर.

४) सदरील प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) नूसार प्रकल्पांतर्गत जलनि:स्सारण वाहीनी शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य विकास महामंडळ (MSRDC) तसेच सिडको विभागाच्या मालकीच्या जागेतून टाकावयाची आहे. सदर ठिकाणी जलनि:सारण वाहीनी टाकण्यासाठी दुसरा कुठलाही पर्यायी मार्ग उपलब्ध नाही. या करीता संबंधीत विभागांकडे रस्ता पुर्नस्थापनेसाठी (Road Restoration) पोटी लागणारे वेळोवेळी आवश्यकते नूसार शुल्क भरावे लागणार आहे. सदरचा खर्च हा योजने व्यतिरिक्त असून, सदरील रस्ता दुरुस्ती शुल्क महानगरपालिकेस संबंधित खात्याकडे भरणा करणे आवश्यक आहे. यासाठी शासन परिपत्रक क्रमांक :संकीर्ण-३४१६/प्र.क्र.४०/नवि-०४ दिनांक २७ मे २०१६ नूसार या योजनेसाठी शासनाकडून प्राप्त अनुदानाच्या रक्कमेवर जमा होणाऱ्या व्याजाच्या रक्कमेतून सदर आकस्मिक खर्च भागविणे अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यामुळे या खर्चाचा कोणताही अतिरिक्त भार महानगरपालिकेवर येणार नाही तरी या होणाऱ्या आकस्मिक खर्चास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

५) प्रकल्पाच्या पूर्व नियोजना नूसार गोलवाडी सिवेज पंपींग स्टेशन (SPS) ते कांचनवाडी या रायझींग मेनच्या सुमारे १.५० कि.मी. लांबीमध्ये मल-जल युक्त पाण्याचा उपसा (Pumping)करावा लागणार असून त्यासाठी १६२६ मी.मी. व्यासाची मलनि:स्सारण वाहीनी (Rising main) टाकावी लागणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास जो सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सादर करण्यात आला होता त्यामध्ये एम.एस.पाईप (Mild steel pipe) ची तरतुद करण्यात आली होती, मात्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी एम.एस.पाईप (Mild steel) ऐवजी जी.आर.पी. पाईप ची तरतुद प्रकल्पात ठेवणे बाबत कळविल्याने प्रकल्पात तसा बदल करुन सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत शासनास मंजूरीस्तव सादर करण्यात आला होता. त्यानुसार या बाबीस शासन मंजुरी प्राप्त आहे. मात्र या बाबत प्रत्यक्ष Rising main टाकण्यापूर्वी आयुक्त स्तरावरील मासिक आढावा बैठकीत अशी चर्चा झाली की, सदर प्रकल्पात Mild steel ची Rising main प्रस्तावित करण्यात आली होती तथापी प्रकल्पात तांत्रिक मान्यता प्रदान करतांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने Mild steel च्या Rising Main ऐवजी GRP ची Rising main टाकणेस

सूचविल्याप्रमाणे व तसा प्रकल्प अहवालामध्ये बदल करुन सदर सूधारित प्रकल्प अहवालाला शासन मान्यता घेण्यात आली. तथापी सदर Rising main करीता GRP एवेजी M.S. ची लाईन टाकल्यास ते तांत्रिक दृष्टया योग्य ठरणार असल्याची बाब चर्चेअंती समोर आली. त्यामुळे या बाबत पुणे महानगरपालिका व ठाणे महानगरपालिकेस चौकशी केली असता,त्यांच्या अनुभवानुसार जी.आर.पी.पाईप हे उच्च दाबासाठी योग्य नसून या GRP ऐवजी, एम.एस.पाईप या Rising main साठी एम.एस.पाईप योग्य असल्याचा या दोन्ही महापालिकांचा अनुभव आहे. या बाबत आयुक्त स्तरावरुन दोन्ही महापालिकांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून चर्चा केली आहे. तसेच या प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचे ही त्यांच्या अनुभवावर आधारीत असे तांत्रिक मत आहे की, GRP पाईप ऐवजी M.S. पाईप Rising main साठी वापरणे हितावह राहील. त्यानूसार Rising main साठी M.S. पाईप वापरण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून प्रकल्पाच्या या उपांगासाठी १६२६ मी.मी. व्यासाचा व १२ मी.मी. जाडीचा पाईप टाकणे आवश्यक आहे. सदर बाब ही मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट नसल्याने ही बाब अतिरिक्त बाब म्हणून करावी लागणार आहे. मुळ प्रकल्पातील तरतुदीनुसार Rising main साठी GRP पाईपसाठी रुपये ३.४४ कोटीची तरतूद करण्यात आली होती. मात्र वर उल्लेख केल्यानुसार GRP पाईप ऐवजी M.S. पाईप टाकणे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाल्याने यासाठीचा खर्च काढला असता तो रुपये ६.१७ कोटी एवढा आला आहे. यातील फरकानुसार व याबाबीसाठी लागणाऱ्या संलग्न किरकोळ खर्चासह रुपये ३.०४ कोटी एवढा खर्च या अतिरीक्त बाबीवर करावा लागणार आहे. या अतिरिक्त खर्चामुळे मुळ प्रकल्प रकमेत बदल होणार नाही. हा खर्च मुळ प्रकल्प रकमेअंतर्गत होणाऱ्या बचतीमधून करण्यात येईल. निविदेतील अटी व शर्ती नूसार होणाऱ्या या अतिरिक्त बाबीचे देयक हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा चालू वर्ष दरसूची सन २०१५-१६ नूसार अंदाजपत्रकीय दराने देण्यात येईल. सदर अतिरिक्त बाबीचे काम हाती घेणे आवश्यक असल्याने होणाऱ्या या अतिरिक्त बाबीच्या रक्कम रु.३.०४ कोटीच्या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

६) प्रकल्प राबवित असतांना निर्माण झालेल्या परिस्थिती नूसार खालील नमूद प्रमाणे इतर अतिरिक्त बाबी (Extra Item)ची कामे करावी लागणार असून, रेल्वे खात्याचे पुर्वीचे धोरण बदलल्याने व त्यांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने रेल्वेपुलाखालुन खोदकाम करुन जलनिःसारण वाहीनी टाकणेस प्रतिबंध करण्यात आला आहे. रेल्वेच्या नविन धोरणानुसार पाच ठिकाणी टाकावयाचे जलनिःसारण वाहीनी रेल्वेट्रॅक खालुन टाकावी लागत आहे. यासाठी रेल्वेखात्याशी पत्र व्यवहार केला असता त्यांनी याबाबीचा खर्च सुमारे ३.५० कोटी एवढा नमुद केला असुन सदर खर्च अतिरिक्त बाबीच्या स्वरुपात करावा लागणार असुन तो या योजनेतील काही बाबीमधुन होणाऱ्या बचतीमधुन भागविण्यात येणार आहे. याशिवाय काम करीत असताना जागेवरील परीस्थीतीनुसार काही ठिकाणी कमी व्यासाचे आर.सी.सी. मेन होल चेबर बांधावे लागत असल्याने, तसेच काही ठिकाणी अत्यंत कमी रुंदीची जागा उपलब्ध असल्याने दरसुची मधील तरतुदी व्यतिरिक्त काही बाबी समोर आल्याने कमी व्यासाची (०.९०मी. व्यासाचे मेन होलचेंबर) बांधावे लागत आहे. याशिवाय काही ठिकाणी जागेअभावी/खोलीनुसार चौकोनी चेंबर बांधावे लागत आहेत. या व इतर किरकोळ बाबीवर रुपये १९.१० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालील तक्त्यात नमुद करण्यात आला आहे.

| अ.क्र | अतिरिक्त बाबीचे नाव (Extra Item) | होणारा अतिरिक्त खर्च |
|---|---|---|
| १ | अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार साधारणतः २ ते २.५ मी. व्यासाची मेन होल चेंबर बांधण्याचे प्रस्तावित होते. मात्र | रुपये ४.३८ कोटी |

| | | |
|---|---|---|
| | जागेअभावी कमी व्यासाची मेनहोल चेंबर बांधावे लागत असल्याने येणारा खर्च | |
| २. | जागेच्या उपलब्धतेनुसार ०.९० मीटर व्यासाचे (NON DSR item) मेनहोल चेंबर बांधण्यासाठी येणारा खर्च | रुपये ७.५० कोटी |
| ३ | प्रत्यक्ष काम करीत असताना काही ठिकाणी अस्तित्वातील मेनहोल चेंबर ची ऊंची वाढविणे, दुरुस्ती करणेसाठी येणारा खर्च, | रुपये ०.७६७१ कोटी |
| ४ | जागेच्या उपलब्धतेनुसार चौकोनी SFRC ढापे टाकणेसाठी येणारा खर्च | रुपये १.६६ कोटी |
| ५ | आवश्यकतेनुसार काही ठिकाणी दलदल असल्याने हार्ड मुरुम टाकणे,सोलींग करणे, एम-१५ कॉक्रीट करणे दगडी बांधकाम करणे इत्यादीसाठी येणारा खर्च | रुपये १.४९ कोटी |
| ६ | स्थळावरील परिस्थितीनुसार जुने पेव्हर ब्लॉक काढुन बसविणे,SWG RCC PVC, वापरणे, GSB (मुरुमाचा थर) टाकणे इत्यादी कामे करणेसाठी येणारा खर्च | रुपये ३.०२ कोटी |
| ७ | आवश्यकतेनुसार काही ठिकाणी पादचारी पुल दुरुस्त करण्यासाठी येणारा खर्च | रुपये ०.२८६५ कोटी |
| | **एकुण** | **रुपये १९.१० कोटी** |

याशिवाय गोलवाडी येथे सिवेज पंपिंग स्टेशनसाठी व जुना वार्ड क्रमांक ९८ वळदगाव शिवार येथे बांधण्यात येणाऱ्या सिवेज पंपिंगस्टेशन Express Feeder व ॲटोमेशन करावे लागत असल्याने यासाठी रुपये ३.५९ कोटी एवढा खर्च अतिरीक्त स्वरुपात करावा लागत आहे. मुळ अंदाजपत्रकानुसार या पंपींग स्टेशनसाठी जवळच्या भागातुन Express Feeder व्दारे वीज पुरवठा उपलब्ध होईल असे गृहीत धरण्यात आले असल्याने त्यासाठीची स्वतंत्र तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली नव्हती. या कारणामुळे सदरचा अतिरीक्त खर्च करावा लागत आहे. वर नमुद प्रमाणे रेल्वे क्रॉसींगसाठी, किरकोळ बाबीसाठी, Rising Main साठी व २४ तास वीजपुरवठा कार्यरत राहणेसाठी घेण्यात येणाऱ्या Express Feeder इत्यादी बाबीसाठी येणारा अतिरिक्त बाबीच्या खर्चाचा तपशिल खालील तक्त्यात नमुद प्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **अतिरिक्त बाब (Extra Item)** | **होणारा अतिरिक्त खर्च** |
|---|---|---|
| १ | रेल्वे क्रॉसींगच्या ठिकाणी पाच जागेवर जलनिःसारण वाहीनीचे काम करणेसाठी | सुमारे रु.३.५० कोटी |
| २ | आर.सी.सी. व विटकामामध्ये मेनहोल चेंबर बांधणे, किरकोळ विटकाम, दगडी बांधकाम करणे, आर.सी.सी.पाईप, एस.डब्ल्यु.जी.पाईप टाकणे व आवश्यकते नूसार कॉक्रीट करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे इत्यादी कामे करणे | सुमारे रु.१९.१० कोटी |
| ३ | गोलवाडी सिवेज पंपींग स्टेशन ते कांचनवाडी मल-जल प्रक्रीया केंद्रा पर्यंत १६२६ मी.मी. व्यासाची व १२ मी.मी.जाडीची सुमारे १९०० मीटर लांबीची M.S.पाईप लाईन Rising main टाकणे | सुमारे रु.३.०४ कोटी |
| ४ | २४ तास वीजपुरवठा कार्यरत राहणेसाठी घेण्यात येणाऱ्या | सुमारे रुपये ३.५९कोटी |

| | | |
|---|---|---|
| | Express Feeder साठी येणारा खर्च | |
| | एकुण | रु. २९.२३ कोटी |

या अतिरिक्त बार्बीची कामे करणे आवश्यक आहे, कारण विविध ठिकाणी जलनिःसारण वाहीनी टाकतांना काही ठिकाणी जागेची उपलब्धता कमी असल्याने, जागेच्या उपलब्धतेनूसार मेनहोल चा आकार बदलावा लागत आहे. त्यामुळे वर नमूद प्रमाणे अतिरिक्त बार्बीची कामे करावी लागत आहेत. यासाठी रु. २९.२३ कोटी चा खर्च अतिरिक्त बाबीसाठी करावा लागणार आहे. ज्या बाबीमध्ये प्रकल्पा वरील हा अतिरिक्त खर्च या योजने अंतर्गत इतर बाबीमुळे होणाऱ्या बचती मधून होणार असल्याने कोणताही वाढीव खर्च या कामावर करावा लागणार नाही. तरी प्रकल्पाच्या मुळ अंदाजपत्रका व्यतिरिक्त या बाबी कराव्या लागत असल्याने या अतिरिक्त बार्बीच्या खर्चासाठी मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर

७) अनेक ठिकाणी कामे चालू असल्याने अनेक ठिकाणी रस्ते खोदण्यात आले आहे. त्यामुळे सदरची कामे नागरीकांची गैरसोय टाळण्यासाठी सत्वर करणे आवश्यक असल्याने स्थळावर विपरित प सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) नूसार व निविदा अटी व शर्ती आणि परिशिष्ट “ब” नूसार काम करीत असतांना निविदेतील काही बाबीं मध्ये १५०% पेक्षा अधिक वाढ होत आहे. काम करीत असतांना त्या त्या वेळच्या परिस्थिती नूसार खोदकामाच्या बाबीमध्ये आणि काही ठिकाणी पाईप टाकण्याची दिशा (Alignment) बदलावी लागल्याने काही बाबींमध्ये १५०% पेक्षा अधिक वाढ होत आहे. अनेक ठिकाणी कामे चालु असल्याने अनेक ठिकाणी रस्ते खोदण्यात आले आहे, त्यामुळे सदरची कामे नागरीकांची गैरसोय टाळण्यासाठी सत्वर करणे आवश्यक असल्याने स्थळावर विपरीत परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी व चालू असलेले काम अर्धवट सोडणे योग्य नसल्याने प्राप्त परिस्थीती नूसार कामे करुन घेतल्याने काही बाबींच्या परिमाणामध्ये वाढ झाली आहे. सदर बाबीस कार्योत्तर मान्यता मिळेल असे गृहीत धरुन सदरचे कामे करुन घेण्यात आली आहेत. असे असले तरी या वाढीमुळे या योजनेच्या खर्चात कोणतीही अतिरिक्त वाढ होणार नाही. सदर प्रकल्पाच्या निविदेतील कलम (Clause) क्रमांक ३८ नूसार निविदेतील बाबींच्या परिमाणात १५०%पेक्षा जास्त वाढ झाल्यास सदर वाढीव कामाचे देयक चालू दरसूची नूसार अदा करणे बाबत तरतुद करण्यात आलेली आहे. त्या नूसार या वाढीव बाबीच्या परिमाणाचे देयक अदा करण्यात येईल. करीता या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या अवलोकनास्तव सादर.

८) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००८/१३३८/प्र.क्र.१७१/०८/नवि-२० मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक २ मार्च-२००९ नुसार “क” वर्गीय महानगरपालिकांसाठी रु.१.०० कोटी पेक्षा अधिक किंमतीच्या सर्व कामांसाठी त्रयस्थ तांत्रिक परिक्षण (Third party Technical Audit) करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच त्यानूसार शासन निर्णय क्रमांक शा.नि.सुनिअ/२०१०/प्र.क्र.५१०/पा.पु.२२ मंत्रालय मुंबई ३२ दिनांक २२ फेब्रुवारी २०११ नूसार थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीटर म्हणून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांची नियुक्ती करण्यात आली असून एकुण प्रकल्प किंमत रक्कम रु. ३६५.६९ कोटीच्या ०.२०% अधिक सर्व्हीस टॅक्स १४.५०% (अतिरिक्त) म्हणजेच रक्कम रु.७२.०० लक्ष एवढी रक्कम शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांना तपासणी शुल्क म्हणून द्यावी लागणार आहे. सदर रक्कमे पैकी रक्कम रु. ३६.५६९ लक्ष एवढी रक्कम शासकीय

अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांना प्रदान करण्यात आलेली आहे. उर्वरीत रक्कम कामाच्या प्रगतीनुसार अदा करावी लागणार आहे. मुळ प्रस्ताव सादर करताना महाराष्ट्र जीवन प्राधीकरणामार्फत शासनास सादर करतेवेळी पीएमसी यांना द्यावयाचे सेवा शुल्क व थर्ड पार्टी इन्स्पेक्शनसाठी येणाऱ्या खर्चाच्या सेवाशुल्काची रक्कम इत्यादीचा समावेश मुळ प्रकल्प रकमेत करण्यात आला होता. मात्र याबाबीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हरकत घेऊन यासाठी येणारा खर्च मंजुर प्रकल्प रक्कमेत केला नाही. त्यामुळे सदर खर्च या योजनेतील जमा झालेल्या अनुदानाच्या रक्कमेतुन भागविण्यात येणार आहे. तसा निर्णय महाराष्ट्र शासनाने शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-३४१६/प्र.क्र.४०/नवि-०४ दिनांक २७ मे २०१६ नूसार या योजनेसाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या आणि बँकेत जमा केलेल्या अनुदानाच्या रकमेवरील जमा होणाऱ्या व्याजाच्या रक्कमेतून अदा करणेस अनुज्ञेय केला आहे. त्यानुसार या योजनेच्या जमा झालेल्या अनुदानाच्या रक्कमेवर निर्माण झालेल्या व्याजातुन हा खर्च करण्यात येत आहे. तरी थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीटर यांचे साठी होणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

९) प्रकल्पासाठी नियुक्त करण्यात आलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) मे.फोट्रेस इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी सर्व्हीसेस,मुंबई यांना स्थायी समिती ठराव क्रमांक ३७ दिनांक ३०.८.२०१० नूसार सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR)तयार करणेसाठी ०.९७% आणि निविदापश्चात कामांसाठी १.२८% दराने म्हणजेच एकुण २.२५% दराने काम करण्यास मान्यता देण्यात आली होती. मात्र दिनांक २४.२.२०१६ रोजी फेर वाटाघाटी नंतर करण्यात आलेल्या सुधारीत करारनाम्यानूसार PMC यांनी मान्य केलेल्या दरानूसार म्हणजेच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी ०.९७% व योजनेच्या कामासाठी १.१५% दराने अदा करण्यास मान्यता झाली आहे.

त्यानुसार सदरील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना प्रकल्प रक्कमेच्या २.१२ % अदा करावयाची रक्कम शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण-३४१६/प्र.क्र.४०/नवि-०४ दिनांक २७ मे २०१६ नूसार या योजनेसाठी शासनाकडून प्राप्त अनुदानाच्या रक्कमेवर जमा होणाऱ्या व्याजाच्या रक्कमेतून अदा करणेस अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यामुळे या वाढीव खर्चाचा कोणताही अतिरिक्त भार महानगरपालिकेवर येणार नाही. तरी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार(PMC) यांना दयावयाची फीस/शुल्क शासन निर्णय दिनांक २७ मे २०१६ नूसार सदर योजनेसाठी बँकेत जमा ठेवलेल्या प्राप्त अनुदानावरील व्याजाच्या रकमेतून अदा करण्यास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

१०) बौध्दनगर, उत्तमनगर, व शिवशंकर कॉलनी भागात UIDSSMT अंतर्गत मुख्य जलनि:सारण वाहीन्या टाकतांना एकुण चार (४) ठिकाणी अस्तित्वात असलेले RCC pipe Culverts तोडावे लागले आहेत. सदर तोडण्यात आलेले RCC pipe Culverts दुरुस्त करणे शक्य नसल्यामुळे त्या ऐवजी सदर चारही ठिकाणी नवीन आर.सी.सी. पुलाचे (R.C.C. Culverts) बांधकाम करावे असे ठरले. या संदर्भात प्रकल्पासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सर्वेक्षण करुन प्रस्तावीत चार (४) आर.सी.सी. पुलाचे बांधकाम करणेसाठी मुळ मंजुर निविदा दरानूसार सुमारे ५५.०० लक्ष खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. सदरील काम करणे करीता महानगरपालिका वार्षीक अर्थसंकल्पात तरतुद केलेली नसल्यामुळे सदर काम भुमीगत गटार योजना (UIDSSMT) या प्रकल्पा अंतर्गत करणे करीता मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

११) काम करीत असतांना अंदाजपत्रकातील ज्या बाबींच्या परिमाणात कमी अधिक वाढ होत आहे, त्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेत होणारा बदल खालील (तक्त्यात नमूद) प्रमाणे होत आहे.

(रु.कोटी मध्ये)

| Sr. No | Description in short | Cost as per Tender | Revised Cost | Extra Item cost | Excess | Saving | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Item. 1 to 5. Excavation in All types of soil | 38.45 | 27.53 | 0 | 0 | 10.91 | मुळ DPR तयार करताना नाल्याच्या कडेला असलेल्या जमीनीवर Trial Pits घेण्यात आली होती. तथापि प्रत्यक्षात काम करताना मातीमध्ये (soft Soil) जास्त खोदकाम झाले मात्र याबाबीचा दर कमी असल्याने याबाबीच्या खर्चात बचत झाली आहे. |
| 2 | Item 6 & 27. M25/M30 Concrete | 0.6058 | 3.15 | | 2.54 | | मुळ निविदेनुसार नाला पात्रातुन आरसीसी पाईप जलनि:सारण वाहीनी टाकण्याची तरतूद करण्यात आलेली होती तथापि काही ठिकाणी नाल्यावर मोठया प्रमाणात बांधकामे झाली असल्याने व काही ठिकाणी पुर्व परवानगीने बांधकामे करण्यात आली असल्याने सदर ठिकाणी पाईप टाकुन जलनि:सारण वाहीनीचे काम करणे शक्य नव्हते. त्यामुळे अशा ठिकाणी आर सी सी ड्रेन बांधुन काम करावे लागणार आहे. याकारणाने याबाबीच्या परिमाणामध्ये वाढ झाली आहे. असे असले तरी याकारणाने पाईपच्या परिमाणामध्ये बचत होणार आहे. |
| 3 | Item. 7.Filling in plinth | 0.44 | 0.44 | | | 0.00 | |
| 4 | Item. 8.Dismentalelling RCC work | 0.135 | 0.135 | | 0.00 | | |
| 5 | Item.9.Shoring and Stutting | 8.71 | 5.06 | | | 3.65 | |
| 6 | Item. 10.Dewatering | 0.66 | 1.94 | 0 | 1.27 | | |
| 7 | Item. 11.Disposal | 4.43 | 4.47 | | 0.39 | | |
| 8 | Item.12.Supply of DWC pipes of Various dia. | 9.61 | 10.16 | | 0.055 | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | Item. 13.Lawering laying and DWC pipe all dia | 0.72 | 0.73 | | 0.094 | | |
| 10 | Item. 14 to 16.Supply of RCC pipes of Various classes and dia. | 49.47 | 62.99 | 0 | 13.52 | | मुळ निविदेतील तरतूदीमध्ये आवश्यकतेनुसार NP2 पाईप व NP3 पाईपची तरतूद करण्यात आली होती. प्रत्यक्षात काम करताना प्राप्त परिस्थिती विचारात घेता मा.आयुक्त स्तरावर चर्चा झाली व चर्चेअंती टाकण्यात येणारी जलनि:सारण वाहीनीचे आयुष्य चांगले राहण्यासाठी NP2 ऐवजी NP3 पाईप वापरण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय बनेवाडी येथील एसटीपीच्या क्षमतेत वाढ करण्यात आल्याने त्या प्रकल्पापर्यंत जाणारे मलजल पाणी पोहचविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पाईपच्या व्यासामध्ये वाढ करावी लागली. याकारणाने याबाबीमध्ये वाढ झाली आहे. |
| 11 | Item. 17. Lawering laying and jointing of RCC pipes all dia.pipe | 3.29 | 3.97 | 0 | 0.68 | | |
| 12 | Item. 18.Supply DI Pipes of various diameter | 2.16 | 0.047 | | | 2.113 | |
| 13 | Item.19.Lowering DI Pipes of various diameter | 0.115 | 0.0028 | | | 0.1122 | |
| 14 | Item. 20,22,24 .Constuction of RCC Manholes of various dia, | 14.18 | 7.24 | | | 6.94 | |
| 15 | Item. 21,23,25. Constuction of Brick Manholes of various dia, | 21.60 | 13.92 | | | 7.67 | |
| 16 | Item.26.Drainage drops | 0.26 | 0.104 | | | 0.16 | |
| 17 | Item. 28. Steel | 0.37 | 1.97 | | 1.60 | | वरील बाबीत नमुद प्रमाणे आर सी सी ड्रेन बांधावी लागत असल्याने त्यासाठी लागणाऱ्या स्टीलची परिमाणामध्ये वाढ झाली |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | आहे |
| 18 | Item. 29.House Services connections | 42.92 | 28.73 | | | 14.19 | प्रत्यक्षात काम करीत असताना जलनिःसारण वाहीनी टाकतेवेळी नागरीकांची जे ड्रेनेज कनेक्शनस् क्षतिग्रस्त झाले त्याचे प्रमाण कमी असल्याने व शहराचा झालेला विकास पाहता बहुतांश ठिकाणी नागरीकांनी त्यांची जोडणी महानगरपालिकेच्या मुख्य जलनिःसारण वाहीनीस यापुर्वीच केलेली असल्याने याबाबीमध्ये बचत झाली आहे. |
| 19 | Item. 30.Refilling | 3.94 | 5.67 | | 1.17 | | प्रत्यक्षात काम करीत असताना Soft soil मध्ये जास्तीचे खोदकाम प्राप्त परिस्थितीनुसार करावे लागले. या कारणाने याबाबीच्या परिमाणात वाढ झाली आहे. |
| 20 | Item. 31. Road restoration | 23.59 | 20.57 | | 3.02 | 0.00 | |
| 21 | Item. 32. Ventilation shaft | 10.41 | 10.41 | | | 0.00 | |
| 22 | Item. 33. Making cross connection | 0.73 | 0.044 | | | 0.068 | |
| 23 | Item. 34. Dismanteling dead pipeline | 0.055 | 0.063 | | 0.0081 | | |
| 24 | Item. 35. Shiftling of existing Utilities | 0.23 | 0.23 | | | 0.00 | |
| 25 | Extra Item.Railway Crossings at 5 places | 0.00 | 0.00 | 3.50 | 3.50 | | या योजनेअंतर्गत पूर्व नियोजना नूसार व सविस्तर प्रकल्प अहवालानूसार (DPR) रेल्वे पुलाच्या खालून पाच ठिकाणी जलनिःसारण वाहीनी टाकण्याचे नियोजन होते,त्यामुळे पुर्वी अस्तित्वात असलेल्या जलनिःसारण वाहीनीच्या ठिकाणी जुनी नादुरुस्त जलनिःसारण वाहीनी काढुन त्याठिकाणी नविन अधिक व्यासाची जलनिःसारण वाहीनी टाकण्याचे प्रयोजन होते. मात्र याबाबत रेल्वे खात्याशी पत्र व्यवहार केला असता |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | रेल्वेखात्याने कळविले की, रेल्वेचे या बाबतचे पूर्वीचे धोरण आता बदलले असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने रेल्वेपुला खालून खोदकाम करुन जलनि:सारण वाहीनी टाकण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यानूसार रेल्वे पुलाच्या खालून जलनि:सारण वाहीनी टाकणे ऐवजी रेल्वे लाईनच्या खालून (BelowTrack) Trench less टेक्नोलॉजी द्वारे जलनि:सारण वाहीनी टाकावी. |
| 26 | Extra Items all | 0.00 | 0.00 | 19.10 | 19.10 | | प्रस्तावातील अनुक्रमांक 5 व 6 मध्ये नमुद प्रमाणे काही बाबी अचानक समोर आल्याने व काही बाबी मध्ये बदल झाल्याने या अतिरीक्त बाबीच्या खर्चात वाढ होत आहे. तथापि या योजनेवर होणाऱ्या खर्चातील बचतीतुन सदर खर्च करण्यात येणार असल्याने योजना खर्चात कोणतीही वाढ होत नाही. |
| 27 | Total | 227.79 | 200.29 | 22.60 | 44.56 | 49.46 | |
| 28 | Contengencies 3% | 7.04 | 6.00 | | | | |
| 29 | Under Ground Network total | 234.83 | 228.90 | | | 5.93 | एकुण बचत रुपये 5.93 कोटी |

वर नमुद प्रमाणे या योजनेमध्ये विविध बाबींमध्ये काही प्रमाणात बदल होत असून त्या नूसार या योजनेचा एकुण आढावा खर्च खालील नमुद प्रमाणे येतो. या तक्त्यात नमूद प्रमाणे कोणताही अतिरिक्त खर्च या योजनेवर होणार नसून संपूर्ण खर्च मुळ योजने प्रमाणे मंजुर रक्कमेच्या मर्यादेतच होत आहे. त्याचा थोडक्यात तपशिल खालील नमूद प्रमाणे आहे.

**(रु.कोटी मध्ये)**

| Sr.No | Description in short | Cost as per Tender | Revised Cost | Extra Item cost | Excess | Saving |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | Construction of STP | १०४.३४ | १०३.९२ | ०० | ०० | ०.४२ |
| | Construction of Seweage pumping station (SPS) | २१.२१ | २४.५३ | -- | ३.३१ | ०० |
| | Rising main | ५.२९ | ८.३३ | ०० | ३.०४ | ०० |
| | **Total Expenditure Required for scheme** | **३६५.६८** | **३६५.६८** | **००** | **६.३५** | **०.४२** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **एकुण वाढ (६.३५-०.४२)** | **रुपये ५.९३ कोटी** |

मुळ मंजुर निविदा दरानूसार या प्रकल्पातील विविध उपांगाचा एकत्रित तपशिल खालील प्रमाणे आहे.

**(रुपये कोटी मध्ये)**

| अ.क्र | योजनेतील उपांगाचे नाव | मंजुर निविदा दरानूसार एकुण रक्कम |
|---|---|---|
| 01 | विविध ठिकाणी STP प्रकल्प उभारणे रेणुका | रु. 155.69 |
| 02 | मुख्य व अंतर्गत जलनि:सारण वाहीन्या टाकणे | रु. 277.20 |
| 03 | विविध ठिकाणी सिवेज पंपींग स्टेशन | रु. 24.86 |
| 04 | गोलवाडी ते नक्षत्रवाडी Rising main टाकणे | रु. 6.24 |
| | **एकुण (योजनेवर होणारा खर्च )** | **रु. 464.00** |

करीता उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ पर्यंत सादर केलेले प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय क्रमांक ७८१ वर या विषयाबाबतही चर्चा झालेली आहे. सर्व स.सदस्यांनी याबाबत चर्चा केलेली आहे. प्रशासनाने टेक्निकल बार्बीचा खुलासा केलेला आहे. स.सदस्यांच्या मतानुसार यात महानगरपालिकेचे कुठलेही नुकसान होऊ नये, या भावनेनुसार सर्वांनी आपआपले मते मांडलेली आहेत. स.सदस्यांनी मांडलेल्या भावनेची नोंद यात घेण्यात यावी. पीएमसीने बदलेल्या डिझायन बाबत माहीती घेण्यात यावी. व्याजाच्या रक्कमेतुन मनपाच्या निधीतून स.सदस्यांच्या वार्डात एक किलोमीटर ड्रेनेज वाहीनी झाली पाहीजे. अशी भुमीका सदस्यांची आहे. अंतर्गत वाहीनी झाली नसल्यामुळे मुख्य वाहीनींचा उपयोग होणार नाही. प्रत्येक वार्डात किमान एक कि.मी. ड्रेनेज वाहीनी करण्यात यावी. सर्व स.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार स.सदस्यांनी मांडलेल्या सुचना विचारात घेऊन उपरोक्त प्रस्तावातील अनुक्रमांक १ ते ११ पर्यंत सादर केलेल्या प्रस्ताव मध्ये करावयाच्या कामाच्या बदलास तसेच त्या कामासाठी लागणाऱ्या खर्चास नियमानुसार प्रशासनाने कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७८३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात सर्वसामान्य व्यक्ती मृत झाल्यावर व त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यास अशा नागरीकांना प्रेत ताब्यात घेण्यासाठी व प्रेत घरी नेऊन त्यावर अंतिम संस्कार करण्यासाठी वेळ लागतो, त्यामुळे शव तसेच ठेवण्यात येते व ते प्रेत एका विशीष्ट कालावधीनंतर कुजण्याची प्रक्रिया सुरू होते व दुर्गंधी निर्माण होते. त्यासाठी प्रेत सुरक्षीत ठेवण्यासाठी १० शीतशवपेट्या खरेदी करण्यात याव्यात. त्यामुळे सर्व सामान्य नागरीकांना मोठ्या प्रमाणात मदत होईल.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.गोकुलसिंग संपतसिंग मलके

श्री.राजू शिंदे :प्रत्येक वार्डात शीतशवपेटया ठेवण्यात याव्यात. जर शव वाहिनी उपलब्ध होत नसेल तर मनपाच्या वतीने व्यवस्था केली जावी.

मा.महापौर :मंजूर.स.सदस्यांची सुचना विचारात घ्यावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात सर्वसामान्य व्यक्ती मृत झाल्यावर अंतिम संस्कार करण्यासाठी लागणारा वेळ विचारात घेऊन त्यासाठी प्रेत सुरक्षीत ठेवण्यासाठी १० शीतशवपेट्या खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्वच्छतेचा महामंत्र देणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा हे थोर पुरूष होऊन गेले आहेत. त्यांनी सर्व समाजाला साफसफाईचा मुलमंत्र दिला. त्यांच्या नावाने आजही सर्व देशभरात स्वच्छता अभियान घेतले जाते. आपल्या शहरात त्यांच्या नावाने एकही रस्ता किंवा चौक नाही.

तरी औरंगाबाद ते मिलकॉर्नर या मुख्य रस्त्यावरील कसबेकर प्रोव्हिजन समोरील कॉर्नरला “राष्ट्रसंत गाडगेबाबा सर्कल” असे नाव देण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे

**अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी, श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे, श्रीमती सुनिता गिरजाराम हाळनोर

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद ते मिलकॉर्नर या मुख्य रस्त्यावरील कसबेकर प्रोव्हिजन समोरील कॉर्नरला नियमाप्रमाणे “राष्ट्रसंत गाडगेबाबा सर्कल” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये वॉर्ड क्र.४९, भडकलगेट, बुढ्ढीलेन अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१. | **भांडवली कामे जलनि:स्सारण**<br>वॉर्ड क्र.४९, भडकलगेट अंतर्गत चर्च समोरील ड्रेनेज लाईन बदलणे र.रु.१०.०० लक्ष<br>पान क्र.लेआऊट न्यु वर्क पेज नं.३ | ०१.वॉर्ड क्र.४९ अंतर्गत विविध ठिकाणी पोलसह विद्युत पथदिवे लावणे.<br>र.रु.१०.०० लक्ष |
| ०२. | वार्ड क्र.४९, सुराणा कॉम्प्लेक्स ते बारुदगर नाला पर्यंत कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५.०० लक्ष<br>पान क्र.एससीआर-वॉर्ड-अ-पा.नं.-५ | वॉर्ड क्र.४९, जुना बाजार येथील श्री.अब्दुल अजीम यांच्या घरापासून ते श्री.कमाल फारूकी यांच्याघरापर्यंत व पुढे मेडीकल जनरल स्टोअर्स पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.२५.०० लक्ष. |

**सुचक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे **अनुमोदक:-**श्रीमती शेख समिना शेख इलियास

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९, भडकलगेट, बुढ्ढीलेन अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१. | **भांडवली कामे जलनि:स्सारण**<br>वॉर्ड क्र.४९, भडकलगेट अंतर्गत चर्च समोरील ड्रेनेज लाईन बदलणे र.रु.१०.०० लक्ष<br>पान क्र.लेआऊट न्यु वर्क पेज नं.३ | ०१.वॉर्ड क्र.४९ अंतर्गत विविध ठिकाणी पोलसह विद्युत पथदिवे लावणे.<br>र.रु.१०.०० लक्ष |
| ०२. | वार्ड क्र.४९, सुराणा कॉम्प्लेक्स ते बारुदगर नाला पर्यंत कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५.०० लक्ष<br>पान क्र.एससीआर-वॉर्ड-अ-पा.नं.-५ | वॉर्ड क्र.४९, जुना बाजार येथील श्री.अब्दुल अजीम यांच्या घरापासून ते श्री.कमाल फारुकी यांच्याघरापर्यंत व पुढे मेडीकल जनरल स्टोअर्स पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.२५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१३, भीमनगर उत्तर अंतर्गत कामांचे लेखाशिर्ष बदलण्यात यावे. कामे नागरीकांच्या सोयी सुविधासाठी करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये | लेखाशिर्ष बदलुन नंतर कामाचे नाव |
|---|---|---|---|
| ०१. | वॉर्ड क्र.१३, भीमनगर उत्तर अंतर्गत विविध रस्त्यांचे कॉंक्रेटिंग करणे (नवीन कॉंक्रेटींग रस्ते शहरी भाग पान क्र. जी.बी.आर. वॉर्ड -ए, पान क्र.०३ अ.क्र.०६) | २५.०० लक्ष | वॉर्ड क्र.१३, भीमनगर उत्तर अंतर्गत विविध विकास कामे करणे. (स्मशान भुमी विकास,खुली जागा) विकास, चौक विकास करणे, ड्रेनेज कॉंक्रीटींग इ.) |

**सुचक:-**श्रीमती आशा विजय निकाळजे **अनुमोदक:-**श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१३, भीमनगर उत्तर अंतर्गत कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये | लेखाशिर्ष बदलुन नंतर कामाचे नाव |
|---|---|---|---|
| ०१. | वॉर्ड क्र.१३, भीमनगर उत्तर अंतर्गत विविध रस्त्यांचे कॉंक्रेटिंग करणे (नवीन कॉंक्रेटींग रस्ते शहरी भाग पान क्र. जी.बी.आर. वॉर्ड -ए, पान क्र.०३ अ.क्र.०६) | २५.०० लक्ष | वॉर्ड क्र.१३, भीमनगर उत्तर अंतर्गत विविध विकास कामे करणे. (स्मशान भुमी विकास,खुली जागा) विकास, चौक विकास करणे, ड्रेनेज कॉंक्रीटींग इ.) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात राहणारे श्री.रविंद्र नाना गायकवाड यांना कॅन्सर हा आजार झालेला असून त्यांचे केमोथेरपी व ऑपरेशनसाठी त्यांना पैशाची आवश्यकता आहे. त्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची असून ते घरातील कर्ते व्यक्ती आहेत. त्यांच्याच आजारपणामुळे दैनंदिन खर्च भागवण्यास अत्यंत कठीण परिस्थिती निर्माण झालेली आहे.

करीता, संबंधीताच्या परिस्थितीचा सहानुभूतीपुर्वक विचार करून त्यांना महानगरपालिकेमार्फत कॅन्सर या रोगावरील उपचारास्तव योग्य ती आर्थिक मदत नियमानुसार करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नितीन दशरथ साळवी **अनुमोदक:-**श्री.बल्लाळ मनोज आसाराम

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.रविंद्र नाना गायकवाड यांना कॅन्सर या रोगावरील वैद्यकीय उपचारास्तव महानगरपालिकेमार्फत नियमानुसार आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०५ मधील खालील कामांचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्या करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र.व पान क्रमांक | मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील मंजुर कामांचे नाव | या कामासाठी लेखाशिर्ष बदलण्यात यावे. |
|---|---|---|
| जी.बी.आर.- वार्ड-ए-८ अ.क्र.७२ | वॉर्ड क्र.१०५, गल्ली क्र.८ व ९ मध्ये सिमेंट कॉंक्रेटींग व ट्रिमीक्स् करणे. आर्थीक तरतुद र.रु.२० लक्ष | वॉर्ड क्र.१०५ अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटींग व ट्रिमीक्स् करणे. या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |

**सुचक:-**श्री.अब्दुल नावीद अब्दुल रशीद **अनुमोदक:-**श्रीमती शेख नरगीस सलीम

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०५ मधील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र.व पान क्रमांक | मनपा अर्थसंकल्प २०१६-१७ मधील मंजुर कामांचे नाव | या कामासाठी लेखाशिर्ष बदलण्यात यावे. |
|---|---|---|
| जी.बी.आर.- वार्ड-ए-८ अ.क्र.७२ | वॉर्ड क्र.१०५, गल्ली क्र.८ व ९ मध्ये सिमेंट कॉंक्रेटींग व ट्रिमीक्स् करणे. आर्थीक तरतुद र.रु.२० लक्ष | वॉर्ड क्र.१०५ अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटींग व ट्रिमीक्स् करणे. या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३३ मिसरवाडी ही वसाहत मागील २५ ते ३० वर्षापासून वसलेली आहे. परंतु आजपर्यंत या वॉर्डात पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन नाही येथील नागरीकांना आज देखिल पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते. तेव्हा शासनाच्या महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई-सुविधांचा विकास या योजने अंतर्गत सन २०१६-१७ करीता

मिळणाऱ्या शासनाच्या अनुदानातून वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी वॉर्डात पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकण्याकरीता रुपये १ कोटी निधी मिळण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शबनम बेगम कलीम कुरैशी **अनुमोदक:-** श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथे शासनाच्या मुलभूत सोई-सुविधांचा विकास या योजने अंतर्गत पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकण्याकरीता रुपये १ कोटी निधी मिळण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७९०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६३ मधील जुने कामे (स्पील) मधील वॉर्ड क्र.४८, सिडको एन-६, शुभश्री कॉलनी येथे घर क्र.९२७ ते घर क्र.९९६ पर्यंतच्या रस्त्यावर ट्रिमिक्स कॉंक्रीट पेव्हींग करणे. अंदाजे र.रु.१४,९७,३००/- रुपये हे कामाची वॉर्डातील रस्ता चांगला असुन ह्या रस्त्यावर कॉंक्रेटींग,पेव्हींग करण्याची आवश्यकता नसुन नियमानूसार हे काम रद्द करून याच्याऐवजी विविध र.रु.१५ लक्ष पर्यंतची विकास कामे करण्यात यावी. जेणे करून वॉर्डातील रहिवाशीयांना वेगवेगळ्या विविध विकास कामांद्वारे सुविधा होऊ शकते.

करीता, हे जुने काम रद्द करून विविध विकास कामे करण्याची मान्यता मिळण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख **अनुमोदक:-**श्री.विकास प्रकाश एडके
श्री.अब्दुल नाईकवाडी :हे चुकीने प्रस्ताव आलेले आहे वगळण्यात यावे.
मा.महापौर :हे दोन्ही प्रस्ताव रद्द करण्यात येते.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**<u>विषय क्रमांक ७९१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६३ मधील जुने काम (स्पील) वॉर्ड क्र.४८, सिडको, एन-६ येथे JNEC कॉलेज ते ओम प्राथमिक शाळे पर्यंतच्या रस्त्यावर ट्रिमिक्स कॉंक्रेट पेव्हींग करणे. अंदाजे र.रु.२४,९९,१००/- रुपये ह्या कामावर न्यायालयाची स्थगिती असून नियमानुसार हे काम होत नसून हे काम रद्द करून त्याच्या ऐवजी बजेट मधील विविध र.रु.२५ लक्ष पर्यंतचे विकास कामे करण्यात यावी. जेणे करून वॉर्डातील रहिवाशीयांना वेगवेगळ्या विविध कामांद्वारे सुविधा होऊ शकते.

करीता, उपरोक्त दर्शविलेल्या प्रमाणे जुने काम रद्द करून विविध विकास कामे करण्याची मान्यता मिळण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख **अनुमोदक:-**श्री.विकास प्रकाश एडके
श्री.अब्दुल नाईकवाडी :हे चुकीने प्रस्ताव आलेले आहे वगळण्यात यावे.
मा.महापौर :हे दोन्ही प्रस्ताव रद्य करण्यात येते.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**<u>विषय क्रमांक ७९२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद या ऐतिहासीक शहरामध्ये पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार निर्मीती व्हावी यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने पर्यटन माहिती केंद्र पर्यटकांच्या सुविधेसाठी सुरु केलेले आहे. या पर्यटन माहिती केंद्रावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर

मराठवाडा विद्यापीठा मार्फत सध्या कार्यरत असलेल्या सहा कर्मचाऱ्यांना प्रायोगीक तत्वावर सहा महिन्यांसाठी नियुक्ती देण्यात आली होती. त्यांचा कालावधी २० डिसेंबर-२०१६ रोजी संपत आहे.

शासनाने सर्व महानगरपालिकांमध्ये पर्यटन केंद्र सुरु करण्याबाबत आदेश निर्गमीत केलेले आहेत. औरंगाबाद महानगरपालिकेने यापूर्वीच पर्यटन माहिती केंद्र सुरु केलेले असून ते पर्यटकांसाठी नियमीत सुरु ठेवणे ऐतिहासीक औरंगाबाद शहराच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

करीता, पर्यटन केंद्रावर प्रायोगीक तत्वावर नियुक्त केलेल्या उपरोक्त एकूण सहा कर्मचाऱ्यांना पुढील सहा महिन्यासाठी कंत्राटी स्वरुपात नेमणुक देण्यात यावी व कंत्राटी स्वरुपातील पर्यटन क्षेत्रातील पदांना मान्यता देण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य, श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले

**अनुमोदक:-** श्री.सचिन सुर्यकांत खैरे, श्रीमती संगिता सुभाष वाघुले, श्रीमती आशा नरेश भालेराव, श्रीमती आशा विजय निकाळजे

श्री.रेणुकादास वैद्य :पर्यटन कक्षाचे उदघाटन केले हजारो लोक वापर करतात चांगले चालत आहे. तेथे कर्मचारी काम करतात त्याची विद्यापीठ प्रशासन अप्सेन्ट टाकली जात आहे. पर्यटन केंद्र बंद होऊ नये तेथे कर्मचारी लागणार आहे तसा प्रस्ताव पाठवावा. जे कंत्राट बेसीस वर लोक घेत आहेत त्याप्रमाणे या लोकांना तुर्त घेण्यात यावे.जे आवश्यक पदे असतील ते मंजूर करून योग्य त्या पध्दतीने भरण्यात यावे.

श्री.नंदकुमार घोडेले :पर्यटन केंद्र सुरू केल्यापासून तेथील लोकांना पगार नाही. विद्यापीठ यात खोडा आणत आहे. योग्य कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल :एमटीडीसी कडून काही मदत पाहिजे असेल तर संबंधीत मा.मंत्रीमहोदय मदत करण्यास तयार आहे पाठपुरावा करावा.

मा.महापौर :प्रस्ताव मंजूर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद या ऐतिहासीक शहरामध्ये पर्यटनाला चालना मिळावी व रोजगार निर्मीती व्हावी यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने पर्यटन माहिती केंद्र पर्यटकांच्या सुविधेसाठी सुरु केलेल्या पर्यटन माहिती केंद्रावर प्रायोगीक तत्वावर नियुक्त केलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या सहा कर्मचाऱ्यांना पुढील सहा महिन्यासाठी कंत्राटी स्वरुपात नेमणुक देण्यास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे पर्यटन माहिती केंद्रात सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियमानुसार अस्थायी नेमणुकीस आणि त्याचबरोबर पर्यटन माहिती केंद्रातील शासनाकडील समकक्ष पदनामास व वेतनश्रेणीसह पद निर्मीतीस मान्यता देण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७९३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२९ मधील महानगरपालिका अर्थसंकल्प वर्ष २०१६-२०१७ मधील खालील कामांचे लेखाशिर्ष रहिवाशीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावा म्हणुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | पान क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ०३ | SCR वॉर्ड B पेज नंबर १७ | संभाजी राजे पुतळा, टि.व्ही. सेंटर देखभाल दुरुस्ती व पॉलीशींग करणे. | वॉर्ड क्र.२९ अंतर्गत विविध ठिकाणी विविध विकास कामे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (आर्थिक तरतुद रुपये २० लक्ष) | करणे.<br>(आर्थिक तरतुद रुपये २० लक्ष) |

**सुचक:-** श्रीमती शोभा नारायण वळसे **अनुमोदक:-** श्री.नितीन रमन चित्ते

श्री.राजेंद जंजाळ :संभाजी राजे पुतळा टी व्ही सेंटर देखभाल दुरूस्ती व पॉलीशींग करणेचा जो निधी राखीव आहे तो वार्ड २९ येथील कामासाठी वळती करू नये २९ वार्डासाठी इतरत्र निधी देण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :हा निधी वळती करू नये.

मा.महापौर :हा प्रस्ताव रद्य करण्यात येतो. प्रस्तावित कामासाठी नव्याने प्रस्ताव ठेवावा.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्रमांक ७९४ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२९ मधील महानगरपालिका अर्थसंकल्प वर्ष २०१६-२०१७ मधील खालील कामांचे लेखाशिर्ष रहिवाशीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावा म्हणुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | पान क्र. | जुने लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०७ | SCR वॉर्ड B पेज नंबर १० | श्रीकृष्ण नगर अंतर्गत उघड्या गटारी वरील ढापे टाकणे.<br>(आर्थिक तरतुद रु.२.५ लाख) |
| ६३ | SCR वॉर्ड B पेज नंबर १४ | वॉर्ड क्र.२९, मिलींद देशमुख यांच्या गल्लीत कॉंक्रीट रोड तयार करणे.<br>(आर्थिक तरतुद रु.१५ लक्ष) |

वरील दोन्ही कामांचे आर्थिक तरतुद रुपये १७.५० लाख (साडे सतरा लाख रुपये) खालील दिलेल्या नविन लेखाशिर्षासह वळती करण्यात यावे.

**नविन लेखाशिर्ष**

वॉर्ड क्र.२९ अंतर्गत आंबेडकर हौसींग सोसायटी येथे कॉंक्रीट रोड तयार करणे, आर्थिक तरतुद रुपये १७.५० लक्ष.

करीता, वरील प्रमाणे लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती शोभा नारायणराव वळसे **अनुमोदक:-** श्री.नितीन रमन चित्ते

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२९ मधील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पान क्र. | जुने लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०७ | SCR वॉर्ड B पेज नंबर १० | श्रीकृष्ण नगर अंतर्गत उघड्या गटारी वरील ढापे टाकणे.<br>(आर्थिक तरतुद रु.२.५ लाख) |
| ६३ | SCR वॉर्ड B पेज नंबर १४ | वॉर्ड क्र.२९, मिलींद देशमुख यांच्या गल्लीत कॉंक्रीट रोड तयार करणे.<br>(आर्थिक तरतुद रु.१५ लक्ष) |

वरील दोन्ही कामांचे आर्थिक तरतुद रुपये १७.५० लाख (साडे सतरा लाख रुपये) खालील दिलेल्या नविन लेखाशिर्षासह वळती करण्यात यावे.

**नविन लेखाशिर्ष**

वॉर्ड क्र.२९ अंतर्गत आंबेडकर हौसींग सोसायटी येथे कॉंक्रीट रोड तयार करणे, आर्थिक तरतुद रुपये १७.५० लक्ष. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळीचे विषय**

मा.महापौर :आजच्या सभेमधील प्रशासनाचे व नगरसेवकाचे ऐनवेळीचे विषय आहे ते मंजूर तसेच मागिल इतिवृत्तास स्वीकृतीसह मंजूरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ७९५:-**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांना हे तांत्रिक विभागाचे प्रमूख म्हणून कार्यरत असतांना हर्सुल तलावातील गाळ काढणे या कामामध्ये गंभीर अनियमितता आढळून आल्या. ज्यामध्ये १) गैरलागू दरसूचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकाची शहानिशा न करता मंजुरीसाठी सादर केले. विभागप्रमुख म्हणून याबाबतीतल्या शासनाच्या नियमांचे पालन केले नाही, २) निविदा प्रक्रिया करतांना विशिष्ट व्यक्तीस काम मिळावे या असद्हेतूने निविदेस योग्य ती प्रसिध्दी न देणे, कनिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राज्यस्तरीय जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्दी देणेबाबत सादरीकरण केले असतांना उच्च पदाच्या अधिकाराचा गैरवापर करून सर्वसामान्यांच्या नजरेस न येणाऱ्या वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करून विशिष्ट मर्जीतील व्यक्तीस सदरचे काम मिळविण्यासाठी प्रयत्न करणे, ३) दिनांक २३ सप्टेंबर-२०१३ रोजीच्या शासन निर्णयाचे पूर्णतः उल्लंघन करणे, ४) निविदा सूचनामधील अटी शर्ती शासन नियमांविरूध्द असून स्वअधिकारात अनावश्यक उच्च दर्जाच्या ठेकेदाराची पात्रता ठेवणे, ५) दिनांक ०२.०३.२००९ च्या शासन निर्णयानूसार एक कोटीपेक्षा जास्त रकमेच्या कामासाठी तृतीय पक्ष तांत्रिक लेखापरीक्षण आवश्यक असतांना शासनाचे निर्देश डावलून देयक अदाईस्तव सादर करणे. या अनियमितता आढळून आल्या आहेत.

तसेच टी.व्ही.सेंटर चौक ते जळगाव रोड जंक्शनपर्यंत मुख्य रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे या कामामध्ये ६) रू.एक कोटीचे काम असतांना निविदा न काढता केवळ दरपत्रके मागवून मंजुरीसाठी प्रकरण सादर केले. वास्तविक पाहता, प्रकरणांत शासन नियमांचे पालन करणे आवश्यक होते. मात्र, शासन नियमांचे पालन केले नाही, ७) कार्यकारी अभियंता यांनी कामाचे ठेकेदार मे.आर.के.इंटरप्रायजेस हे अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्याचे सादरीकरण केलेले असतांना संबंधितांनी ७.५% जास्त दराने काम मंजूर करण्यास प्रस्तावित केले. वास्तविक पाहता, विभागप्रमुख या नात्याने महानगरपालिकेचे आर्थिक हित जोपासण्याचे दृष्टीने ठेकेदार व अधिनस्त अधिकारी यांचेशी समक्ष चर्चा/वाटाघाटी करून अंदाजपत्रकीय दराने काम अंतिम करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी त्यांचे कर्तव्य नीट न बजावल्यामुळे महानगरपालिकेचे रु.७,५०,०००/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. या बाबीस ते व्यक्तीशः जबाबदार आहेत, ८) मा.सर्वसाधारण सभेने मे.जे.पी.इंटरप्रायजेस यांना व्हाईट टॉपींगचे काम देण्याची मान्यता प्रदान केली आहे. परंतु त्याऐवजी सदरचे रू.एक कोटीचे काम मे.आर.के.इंटरप्रायजेस यांना दरपत्रके मागवून देण्यात आले. ही बाब मा.सर्वसाधारण सभेस अवगत करण्यात आलेली नाही. त्यामुळे मा.सर्वसाधारण सभा व मा.स्थायी समितीची दिशाभुल झाली आहे. या अनियमितता आढळून आल्यामुळे संबंधितांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१६/१४७३, दिनांक ०८.०९.२०१६ अन्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच संबंधितांविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी दिनांक २७.१०.२०१६ रोजी दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहे.

श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता (निलंबित) यांची नियुक्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५ अन्वये करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६(१)(ब) नुसार कलम ४५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असेल तर त्याचे निलंबन व त्यासंबंधीची कारणे महानगरपालिकेस (मा.सर्वसाधारण सभा) कळविणे आवश्यक आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. संबंधीतांची वेतनश्रेणी रु.१५,६००-३९,१०० ग्रेड पे ७,६००/- अशी आहे.

करीता, श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता (निलंबित) यांचे निलंबन व त्यासंबंधीची कारणे महानगरपालिकेस कळविणे, त्यांचे निलंबन कायम करणेस मान्यता देणे व त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

श्री.नंदकुमार घोडेले :मागिल बैठकीत निलंबीत अधिकारी यांचे विभागीय चौकशीचे विषय होते त्यावेळी आपण निर्णय दिला होता की सर्व विषय एकत्रित करून येत्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावे.त्याबदल काय झाले खुलासा करावा.

श्री.राजू शिंदे :मागिल बैठकीत ते विषय आलेले होते ते आता गृहीत धरुन आजचे विषय गृहीत धरून एकत्रित ते करून ते करण्यात यावे. कारण बऱ्याचदा प्रशासन सभागृहाला गृहीत धरते आपणही ते विषय गृहीत धरावे.

श्री.गजानन बारवाल :मागील बैठकीत ते विषय आलेले होते. ज्या चौकश्या करणार आहे टेक्नीकल पर्सनने जे की श्री.डी पी कुलकर्णी हे टेक्नीकल पर्सन असतील तर त्याप्रमाणे चौकशी झाली पाहिजे. जर त्याची चौकशी विभागीय आयुक्त करणार असेल तर तशी न करता जे उपसंचालक असतील त्यांचेकडून करावी श्री.पानझडे हे शहर अभियंता आहे त्यांची चौकशी मुख्य अभियंता यांचेकडून करावी अशी सुचना केलेली होती त्याची दखल घ्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :मागिल बैठकीत यावर चर्चा झाली होती. प्रशासनाला सुचना केल्या होत्या की, या प्रस्तावाचे एकत्रित अवलोकन करून प्रस्ताव ठेवण्याचे आदेशीत केले होते. प्रस्ताव आले नाही. विनंती राहणार आहे की, जे काही अधिकारी असतील त्यांचे चौकश्या निश्चितपणे झाल्या पाहीजे. दोषी असेल तर शिक्षा नक्कीच झाली पाहिजे. परंतु चौकश्या चालू असतांना अननेसेसरी त्यांना बाहेर काढून ठेवायची आवश्यकता नाही. पेपरला आले की, श्री.पानझडे यांनी निलंबीत असतांना मा.कोर्टात स्टेटमेंन्ट शपथपत्र दिले असे वाचले. एरवी होते असे की, मनपाच्या कामकाजामध्ये ५-६ अधिकारी आहे, ते काम करत असतांना बऱ्याच अपेक्षा असतात. कामे होणे अपेक्षीत असते. अशा वेळेस अशा पध्दतीने मा.कोर्टाने ठपका ठेवणे. त्रासदायक प्रशासनाला होते. विनंती जे अधिकारी निलंबीत झाले, त्याचे पैकी कुणी दोषी असेल तर त्यांना शिक्षा झाली पाहिजे. सभागृहाचे मत आहे. कुणाचेही दुमत नाही परंतु संशयीत म्हणून त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात ठेवून फाशीवर चढवणे. हे योग्य होणार नाही. निलंबीत झालेल्यांना ७५ टक्के पगार देतो. मनपाकडे मॅन पावर नाही. असे सांगतो यांना सेवेत घ्यावे त्यांची चौकशी करावी. ती निपक्षपातीपणे झाली पाहिजे.

आताच म्हटले की, टेक्नीकल व्यक्तीकडून चौकशी करावी, त्यांचेकडून करा दोषींना शिक्षा नक्कीच दयावी. सर्वांना कामावर घ्यावे. चौकशी नंतर त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :मागिल सभेत या अधिकाऱ्याच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव आला होता त्यावेळी असे आदेशीत केले होते की, तो प्रस्ताव स्थगित ठेवून या सर्व अधिकाऱ्यांचा जे काही आरोपपत्र असतील. चौकशी करायची असेल. ते सर्व एकत्रित प्रस्ताव येणाऱ्या बैठकीत ठेवावे. ते प्रस्ताव ठेवले की, नाही खुलासा घ्यावा. १०० टक्के या अधिकाऱ्यावर कठोर अशी कार्यवाही व्हायला पाहिजे. विभागीय चौकशी व्हायला पाहिजे. कुणाचेही दुमत नाही. काही अधिकारी यांना ६-६ महिने ७-७ महिने झाले. त्यांना ७५ टक्के पगार देतो हे योग्य नाही. अनेक अधिकारी यांना अतिरिक्त कार्यभार सोपविलेला आहे. जे.ई. असेल कार्यकारी अभियंता असेल, अधिकारी संख्या कमी असल्याने वार्डातील कामे होत नाही. जे निलंबीत अधिकारी आहे त्यांना रूजू करून घ्यावे. चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी.

श्रीमती समीना शेख :चौकशी झाली पाहिजे. त्यांना घरी बसून ७५ टक्के पगार देतो हे ठिक नाही. काम करून घ्यावे अनेक योजना आहे ते काम अधिकारी करू शकतात. युआयडीएसएसएमटी, रमाई घरकुल, प्रधानमंत्री घरकुल योजना आहे. तसेच १५० कोटीच्या रस्त्याची कामे करण्यासाठी पीएमसी नेमत होतो. त्यासाठी हे अधिकारी काम करू शकतात. त्यांचेकडून काम करून घ्यावे. ७५ टक्के पेमेन्ट देणे योग्य नाही. असा मनपाचा पैसा वेस्ट जाऊ नये. म्हणून यांचेकडून काम करून घ्यावे. जे अधिकारी दोषी त्यांची कार्यवाही चालूच ठेवावी. त्यांचेकडून काम करून घ्यावे. ही विनंती आहे. १६-१८ अधिकारी यांना डबल काम जे की, अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. त्यांचेकडे कामाचा वर्कलोड होतो आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :मागच्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रीकेवर हे विषय होते. त्यावर कायदेशीर बाबी विषयक सविस्तर चर्चा झाली होती. त्यावेळी त्याबाबत डिटेल सल्ला घेऊन सभेपुढे प्रस्ताव आणावे. असे सुचीत केले होते. परंतु ऐनवेळी तसा प्रस्ताव आलेला नाही. एकच प्रस्ताव शहर अभियंता यांचे बाबतीतला ऐनवेळी आलेला आहे. याचे मागची कायदेशीर पार्श्र्वभुमी काय आहे. हे तपासणी करणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे अधिकारी यांचेवर एक प्रकारचा आरोप असेल तर ठिक आहे, परंतु २-३ आरोप काहींवर आहे. ते सिध्द झालेले आहे. त्यांना कमावर घेणे बाकीच्यांना तसेच ठेवणे योग्य नाही. एकत्रित ठराव आला असता, तर नक्कीच कायदेशीर बाबींवर चर्चा करण्यात आली होती. मागच्या सभेत मी प्रश्न विचारले, त्यांचे उत्तर मिळाले नाही. निलंबीत अधिकारी यांचेवर कोणत्या कायद्याने कार्यवाही करता आहात? किती दिवसात कार्यवाही करणे आवश्यक होते? जर त्यांना रूजू करून घ्यायचे असेल तर नियमात काय तरतूद आहे? खुलासा करावा. सर्व प्रस्ताव प्रशासनाकडून घेण्यात यावे. त्यावर चर्चा करून योग्य निर्णय घ्यावा.

मा.महापौर :शहर अभियंता यांचा विषय ऐनवेळी आलेला आहे. त्या बरोबर इतर अधिकाऱ्याचे विषय घेऊ सर्व विषयावर चर्चा करता येईल.

श्री.नंदकुमार घोडेले :या आधीची सभा झाली. त्यांचे इतिवृत्त सुध्दा आहे.

मा.महापौर :त्या सभेचे इतिवृत्त यात नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :सभागृहाची भावना लक्षात घेवुन सर्वांना सरसकट रूजू करून घ्यावे, त्यांची चौकशी करा, आमची हरकत नाही. परंतु एक विषय घेवु नये. सर्वांना एक न्याय द्यावा.

मा.महापौर :विषय क्रमांक ७९५ जो विषय आलेला आहे. शहर अभियंता व इतर अधिकारी यांचा कॉमन विषय जे मागच्या बैठकीत होते, या संदर्भात काय निर्णय घ्यायचा? चर्चा करण्यात यावी.

श्री.विकास एडके :अधिकारी यांच्या संदर्भात बोलत असतांना, माझी अशी भुमीका आहे. हे निलंबीत अधिकारी असतांना कोर्टामध्ये जावुन Independet Affidavite देतात. दिव्य मराठीमध्ये हे Exposs केलेले आहे. माझे म्हणणे असे आहे की, ते Suspend असतांना हे कार्यवाही करू शकतात, प्रस्तावामध्ये ०३ अधिकारी आहे, सहाय्यक संचालक नगर रचना, शहर अभियंता, मुख्य अग्निशमन अधिकारी, कारवाई मध्ये काहीतरी Pressure किंवा Infulance आणु शकतात, खुप काळ झालेला आहे, यांना Suspend केलेले आहे, जास्तीत जास्त असे करू शकतो की, यांची कारवाई पुर्ण करुन त्यांच्यावर जे Conclusion प्रशासनाला काढायचे आहे, ते काढावे आताच चर्चा झाली की, त्यांना सेवेत घ्यावे, त्यांना ७५ टक्के पगार देतो, २५ टक्के नुकसान होत आहे. त्या नुकसान भरपाईसाठी लवकरात लवकर कारवाई करून जे Conclusion निघेल त्याच्यानंतर यांना रुजु करून घेण्यात यावे.

श्री.नंदकुमार घोडेले :ऐनवेळचा शहर अभियंता यांचा प्रस्ताव आलेला आहे,

मा.महापौर :स्थगीत असलेले प्रस्ताव घेण्यात येते.

श्री.नंदकुमार घोडेले :सर्वच प्रस्ताव एकत्र करून सभेसमोर ठेवण्यात यावे, ही माझी सुरूवातीपासून मागणी आहे. जे अधिकारी ४५ अन्वये नियुक्त अधिकारी प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे, त्यांना निलंबन केल्यावर विशिष्ट कालावधीमध्ये त्यांची कारणमिमांसा देवुन विभागीय चौकशी करीता आलेला आहे, असे किती अधिकारी आहेत? शहर अभियंता, डी.पी.कुलकर्णी असतील, किती अधिकारी ४५ अंतर्गत येतात? स.सदस्य आपल्या भावना व्यक्त करतील. परंतु त्यांच्या विभागीय चौकशीस अधिन राहुन त्यांना पुर्वपदावर सेवेत घेण्यात यावे, अशी मी सभागृहाच्या माध्यमातुन विनंती करतो. स.स.राजु वैद्य यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आपण ७५ टक्के पगार देतो. महानगरपालिकेच्या कामकाजामध्ये मोठे मोठे अधिकारी नसतांना मा.आयुक्त सक्षमपणे या ठिकाणी काम करतात, परंतु अधिकारी यांची कुठेतरी कमतरता भासत आहे. या अनुषंगाने त्यांचे जे निलंबन केलेले आहे. ते रद्द करून चौकशीस अधिन राहुन, कुठल्याही प्रकारच्या चौकशीस अडथळा होणार नाही. असे आदेश देवुन त्यांना पुर्ववत सेवेत घेण्यात यावे.

श्री.विकास एडके :माझा विरोध नोंदविण्यात यावा, माझा मा.न्यायालयात PIL दाखल केलेले आहे. तीन पोस्ट आहेत या Constituational Post आहेत. त्यांना रूजुही करून घेतले तर त्यांना कुठे बसवणार ?

श्रीमती शेख समीना :त्यांना रूजु करून घेण्यात यावे, परंतू त्या department मध्ये नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :कुठे नियुक्ती द्यायची? ते आयुक्त बघतील. त्यांना रूजू केल्यानंतर कुठे बसवायचे? याचा निर्णय प्रशासनाचे प्रमुख म्हणुन आयुक्त घेतील. तो आपला विषय होवु शकत नाही. आपल्याकडे एवढे पेंडींग विषय आहेत, कुठले कामे द्यायचे ते मा.आयुक्त ठरवतील. परंतु, त्यांना महापालिकेत manpower कमी असल्यामुळे, त्यांना रुजु करून घ्यावे. असे अनेक प्रोजेक्ट आहे, जिथे स्किल अधिकारी यांची गरज आहे. त्यांना आजही ७५ टक्के पगार दिला जातो. त्यांना रूजू करून घ्यावे. त्यांना कुठे बसवायचे याचा सर्वस्वी अधिकार आयुक्तांना प्रदान करून नियमानुसार त्यांना रुजु करून त्यांची चौकशी व्हावी, चौकशीतल्या एकाही दोषीला चौकशी नंतर सोडण्यात येवु नये, असे स्पष्ट मत आहे. परंतु, चौकशी होईपर्यंत Unnessesary त्यांना सहा-सहा, आठ-आठ वर्ष झाले. घरी बसुन पगार देणे योग्य नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :सर्वांच्या याच भावना आहेत, मी जो प्रस्ताव मांडला त्यास मंजूरी द्यावी. ज्यांचा विरोध आहे, तो नोंदवुन यांना रूजू करून घ्यावे.

श्रीमती समीना शेख :रूजू करून घ्यावे. अशी माझी विनंती आहे.

श्री.अफसर खान :अधिकारी यांचे प्रस्ताव यापुर्वीच्या बैठकीत होते, आता शहर अभियंता यांचा आहे, यामध्ये mention करून घेण्यात यावे, आज आपल्याकडे स्टाफ कमी आहे, एका अधिकारी यांचेकडे दोन, तीन चार्ज आहे ही अवस्था मनपाची आहे. जे चार्जेस् लागलेले आहे. त्यावर Enquiry होणे आवश्यक आहे. जशी विभागीय आयुक्तांची जशी चौकशी आली होती, आमचे हे मत आहे की, Enquiry त्याच टेक्निकल, डेप्युटी अधिकारी यांचेकडे चौकशी (pwd) देण्यात यावी. त्यांना कामावर घेण्यात यावे, दोषी असेल तर कडक कारवाई करण्यात यावी. त्यांना रूजू करून घेण्यात यावे. सर्वाची विभागीय चौकशी करावी. दोषी असेल तर कार्यवाही करावी. काम करण्यास अधिकारी संख्या कमी आहे. ७५ टक्के पगार त्यांना देतो. २५ टक्के घरी बसुन पगार देतो, मनपाचे नुकसान होते.

मा.महापौर :सभा काही वेळासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ दु.१.४५ वा. पुन्हा २.५५ वा.सभेला सुरूवात.)

श्री.नंदकुमार घोडेले :या ठिकाणी निलंबीत अधिकारी यांचे एकत्रित सर्व प्रस्ताव या सभेत ठेवण्यास सांगितले होते. त्याच्या आधीच्या सभेत सर्व प्रस्ताव आले होते, आज शहर अभियंता श्री.पानझडे यांचा प्रस्ताव ऐनवेळी ठेवलेला आहे. त्या संबंधाने मी माझे मत या ठिकाणी मांडलेले होते, निलंबन रद्द करून चौकशीस अधिन राहुन सर्वांना रूजू करून घ्यावे, अशी विनंती सभागृहास केली होती, त्या विषयावर सभा तहकूब करून पुन्हा त्याच विषयावर मी जो प्रस्ताव मांडला, त्यावर निर्णय घेण्यात यावा.

मा.महापौर :ठिक आहे.

श्री.जफर शेख :जे बेजबाबदार अधिकारी आहेत, ते आपली डयुटी योग्यरीत्या निभावत नाही आणि माझी अशी मागणी आहे की, जो पर्यंत चौकशी पूर्ण होत नाही, त्यांना परत घेवू नये. परत कामावर घेणे म्हणजे एक चुक माफ करून दुसरी चुक

करणेस संधी देणे होईल. ही विनंती करण्यात येते की, यांची चौकशी झाल्यावरच कामावर घेणे, चौकशी झाल्याशिवाय निर्णय घेण्यात येवु नये,

श्री.भाऊसाहेब जगताप :मागिल सभेत सात विषय व आजचा एक असे आठ विषयाच्या अनुषंगाने विनंती करण्यात येते की, अधिकाऱ्यांची कमतरता आहे. अधिकारी याचे चौकशी संदर्भात आहे. अधिकारी यांची संख्या कमी आहे. त्याच अधिकारी यांचेकडे तीन तीन चार्ज दिलेले आहे. विकास कामे होत नाही. निलंबीत अधिकारी यांना ७५ टक्के पगार दिला जातो. जर शासनाचे अधिकारी असेल तर त्यांना निलबीत केले तर कामावर घेऊन दुसऱ्या ठिकाणी पोस्टींग दिल्या जाते, चौकशी केली जाते. घरी बसून पगार दिला जात नाही. आज आपण घरी बसून यांना पगार देतो, विनंती की या सर्वाची विभागीय चौकशी करावी. मा.आयुक्तांच्या अधिकारात रुजू करून देण्यात यावे. त्या अधिन राहून त्यांना कामावर घ्यावे.

श्री.गजानन बारवाल :ऐनवेळचा ७९५ विषय प्रशासनाकडून आलेला आहे, विवीध प्रस्ताव अशा प्रकारे यापुर्वीच्या बैठकीत आले होते, आलेल्या प्रस्तावामध्ये स.सदस्यांनी आपल्या सूचना मांडलेल्या आहेत. यापुर्वीच्या सभेतही सात प्रस्ताव आलेले होते. हे सर्व अधिकारी अनेक वर्षापासून सेवेत आहे. त्यांचेकडून चुका झाल्या असतील, त्यांना मा.आयुक्तांकडून शास्ती लावण्याचा प्रयत्न झाला. त्या त्या खात्या मार्फत जे की, श्री.पानझडे यांची चौकशी करतांना चिफ इंजिनिअर सारख्या अतिशय मोठ्या दर्जाच्या अधिकारी कडुन चौकशी करावी. श्री.डी.पी.कुलकर्णी यांची टेक्निकल अधिकाऱ्यामार्फत चौकशी करावी. यांच्यावर केलेले आरोप जसे जळगांव रस्त्यांचे व्हाईट टॉपींग करणे, यामध्ये सहा कोटी रूपयांचे काम असतांना निवीदा न काढता दरपत्रक मागवुन घेण्यात आले, हे सर्व टेक्नीकली आहे. मा.आयुक्तांनी दिलेल्या आहेत. र.रु.७ लाख ५० हजारांचे नुकसान झाल्याचे दर्शविले आहे. ह्या गोष्टी टेक्निकली आहे, हे सर्व बघता, या गोष्टींची चर्चा न करता, या ठिकाणी टेक्नीकल व्यक्तीकडुनच ही चौकशी करावी.

श्री.भगवान घडमोडे :मागच्या बैठकीत आपण अधिकाऱ्यांच्या चौकशीचे प्रस्ताव ठेवले होते, आता श्री.पानझडे यांचेसह प्रस्ताव आहे. अधिकारी यांच्याकडुन चुका झाल्या, म्हणुन निलंबीत केले आहे. प्रशासनाशी आम्ही सहमत आहे. परंतु विभागीय चौकशी करत असतांना आपण अनेक दिवस विलंब का केला? याचा सुध्दा खुलासा प्रशासनाने केला पाहीजे. कारण आपण त्यांना घरी बसून पगार देतो ते सुध्दा महानगरपालिकेचे नुकसान आहे, त्यामुळे ताबडतोब त्यांचे मागे चौकशा लावयला पाहिजे होत्या, म्हणजे बऱ्याच अधिकाऱ्यांच्या चौकशा होवुन आत्तापर्यंत काहीतरी निर्णय झाला असता, जी त्यांची चुक असेल त्यांना शिक्षा मिळाली असती, त्यांच्या चुका नसतील. त्यांना न्याय मिळाला असता. परंतु, त्यातही विलंब केला आहे. आजही आपण ऐनवेळचा विषय आणुन फार काही वेगळ करतो असे नाही. त्यामुळे त्यांची ताबडतोब विभागीय चौकशी करण्यात यावी. अशी विनंती करतो.

श्री.दिलीप थोरात :सर्व स.सदस्यांनी आपल्या भूमिका मांडलेल्या आहेत. अधिकाऱ्यांच्या निलंबनाबाबत आपल्या भुमिका मांडलेल्या आहेत. मनपात तज्ञ अधिकारी यांचे

मनुष्यबळ कमी आहे. आर्थीक नुकसान होत आहे. जे निलंबीत आहेत, त्यांना लाखो रूपये पगार देतो. यांना अधिकार काय द्यायचा? हा प्रशासनाचा अधिकार आहे. मनुष्यबळाचा अभाव आणि आर्थीक नुकसानीचा विचार करता, सर्वच अधिकाऱ्यांना, विभागीय चौकशी चालू असतांना कामावर घ्यावे. कामावर घेऊन विभागीय चौकशी करावी. दोषी असेल तर कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल ताहेर शेख :जो ऐनवेळीचा प्रस्ताव आहेत. त्यात म्हटले की, निलंबन कायम करण्यास व विभागीय चौकशी करण्यास मान्यता द्यावी. विभागीय चौकशी करण्यास हरकत नाही. निलंबन कायम करायचे की नाही हा सभागृहाचा अधिकार आहे. सध्या ७५ टक्के पगार देतो म्हणून कामावर घ्यावे असे मत मांडले जात आहे. परंतु माझे खाजगी मत असे की, This can not be a criteria त्यांचे कामाच्या दृष्टीने व जबाबदारीच्या दृष्टीने किती पैसा खर्च होतो? हा criteria असू शकत नाही. होत नाही याचा विचार करता येणार नाही. याबाबीवर निलंबन रद्द केले तर त्या बाबतीत मनपास चॅलेन्ज होईल व विरोधात जाईल. आम्हाला critsize केले जाईल, म्हणुन या बाबतीत माझे असे मत आहे. चार्जशीट झाले असेल व त्याचा रिप्लाय आला असेल, याचा अभ्यास करून तुलना करून अभ्यास करून योग्य निर्णय घ्यावा.

श्री.नंदकुमार घोडेले :सर्वच नगरसेवकांनी आपली भुमिका मांडलेली आहे. निर्णय घेण्यात यावा.

श्री.विकास एडके :विभागीय चौकशी करावी त्यानंतर निर्दोष असेल तर रूजू करून घ्यावे. त्या अगोदरच रूजू करणेस विरोध आहे. माझा व माझ्या पक्षाचा विरोध आहे. त्यांना पेमेंट देतो म्हणुन कामावर घेणे हे योग्य नाही, घेतले तर पुन्हा चुका करीत राहतील. म्हणुन आमचा विरोध आहे.

श्रीमती समीना शेख :पक्षाचा विरोध आहे. सेल्फ विरोध असेल. चौकशी चालु असतांना त्यांना सेवेत रुजु करा परंतु त्या पदावर नाही दुसऱ्या पदावर घ्यावे व दुसऱ्या विभागात द्यावे. वर्कलोड जास्त झाला आहे. ९-९,१३-१३ वर्षापासून अतिरीक्त पदभार दिलेला आहे. शासनाकडून अधिकारी मागवत नाहीत. तसेच अनेक वर्ष अधिकारी निलंबीत राहतात. चौकशी लवकर होत नाही. त्यामुळे त्यांना सेवेत रुजू करून घ्यावे. मी माझी प्रतिक्रीया दिलेली, आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :सर्वच स.सदस्यांनी आपआपली भूमिका मांडलेली आहे.

श्री.अय्युब जहागिरदार :सर्व कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही करावी. लीगल डिपार्टमेंट कडून सल्ला घेण्यात यावा. पुढे चालून आपल्याला कायदेशीर काही अडचणी होवू नये, लीगलचा सल्ला घ्यावा. स.सदस्य श्री.ए.टी.शेख यांनी मांडलेल्या मुद्यांचा विचार व्हावा. मा.न्यायालयाचा त्रास होता कामा नये. लीगली ओपनियन घेतला पाहिजे. नसता पुन्हा त्रासदायक होईल. मा.न्यायालयात निर्णय घेतल्यावर आपल्याला त्रास होणार नाही. या बाबी तपासून निर्णय घ्याव्यात. लीगल बाबी तपासण्यात याव्यात. कायद्यानुसार कामावर घेऊ शकत असेल तर कार्यवाही करावी.

मा.महापौर :सभागृहात झालेल्या चर्चे प्रमाणे स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता, विषय क्रमांक ७९५, ७०३, ७०४, ७०५, ७०७, ७५४, ७०२, ७०६ शहर अभियंता यांचा ७९५ या ठिकाणी चर्चा होत असतांना या विषयावर सदस्यांनी आपआपली मते मांडली. कामावर घेत असतांना कायद्याचे चौकटीत राहून कुठेही कायद्याचे उल्लंघन होणार नाही. कायद्याच्या बाबींची कुठेही अडचण न करता जो

सर्वसाधारण सभेचा अधिकार आहे. या विषयी प्रशासनाचे मत वेगळे असू शकते. त्या मताशी बरेचशे सदस्य सहमत आहेत. म्हणुन या सभेचा निर्णय होत असतांना यामध्ये शहर अभियंता श्री.पानझडे निलंबीत शहर अभियंता यांचे निलंबन कायम करणे व विभागीय चौकशीचा प्रस्ताव आहे. मागिल सभेत ७ प्रस्ताव होते त्या सहीत व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व स.सदस्यांनी केलेल्या सुचना विचारात घेता, त्या अधिकाऱ्यांना आजही ५० टक्के वेतन काहीही काम न घेता वेतन अदा केले जाते. त्यांना ज्या कारणासाठी निलंबित केले, त्याची विभागीय चौकशी झालीच पाहिजे, असे सर्व सदस्यांचे मत आहे. तथापी, स.सदस्य यांनी केलेल्या सूचना प्रमाणे आधीच महानगरपालिकेत अधिकारी/कर्मचारी यांची संख्या कमी असल्याने जे निलंबीत आहे त्यांचे निलंबन रद्द करून त्यांना महापालिका सेवेत पुर्ववत रूजू करून घेण्यात यावे. तसेच त्यांची विभागीय चौकशी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. त्याच प्रमाणे अन्य निलंबीत अधिकारी कर्मचारी यांचे संदर्भातील दिनांक १९-११-१६ रोजीच्या सभेत विषय क्रमांक-७०३,७०४,७०५,७०७,७५४ यांना देखील चौकशीत बाधा निर्माण होणार नाही त्यांना महापालिका सेवेत पुर्ववत रूजू करून घेण्यात यावे तसेच त्यांची विभागीय चौकशी करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात येते. विषय क्रमांक-७०२ नुसार श्री.सय्यद फईमोद्दीन, उपअभियंता, सेवानिवृत्त तसेच विषय क्रमांक ७०६ नुसार श्री.मोहमंद वसील, शाखा अभियंता, सेवानिवृत्त या दोन सेवानिवृत्त अभियंत्याच्या बाबतीत नियमाप्रमाणे चौकशी करून प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल :टेक्निकल व्यक्तीकडुन श्री.एस.डी.पानझडे व श्री.डी.पी.कुलकर्णी यांची चौकशी करावी. दोन टेक्निकल पोस्ट आहेत.

मा.महापौर :स.सदस्य श्री.बारवाल गजानन यांनी केलेल्या सूचनेनुसार, त्या सूचनांचा आदर करून टेक्निकल विभागाच्या माध्यमातून चौकशी करावी.

मा.आयुक्त :जो ठराव घेतला त्या संबंधी प्रशासनाच्या वतीने मनपा आयुक्त म्हणून विरोध करीत आहे. जो पर्यंत यांची विभागीय चौकशी होत नाही, तोपर्यत यांना अजिबात कामावर घेऊ नये. सहाय्यक संचालक नगर रचना ज्या प्रकरणात निलंबीत झाले होते, असे आणखी ४ प्रकरण आहेत अशा प्रकारच्या अधिकारी विरुध्द फौजदारी गुन्हा करायला पाहिजे. शहर अभियंत्याच्या विषयामध्ये आणखी ३-४ प्रकरणे अशी आहे की, त्या आधारावर फौजदारी गुन्हा होवु शकतो. माझा विरोध आहे, अशा प्रकारचा ठराव करू नये.

मा.महापौर :मा.आयुक्त साहेब आम्ही जे अधिकार आहे. त्याप्रमाणे आमचे मत मांडले आहे. तुम्हाला पुर्ण अधिकार आहे, तुमचे मत मांडण्याचे. प्रशासनाने जे नियमात असेल, त्यानुसार कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :प्रशासनाचा यास पुर्ण विरोध आहे.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आणि सभागृहात झालेल्या चर्चेनुसार विषय क्र.७९५ नुसार श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांची विभागीय चौकशी सुरु करणेस मान्यता देण्यात येते. तसेच श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांचे निलंबन कायम करणेस मान्यता मिळणेस्तव प्रशासनाने

दिलेला प्रस्ताव व झालेल्या चर्चेनुसार त्यांचे निलंबन रद्द करावे त्यांना कामावर घेण्यात यावे. तसेच श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांच्या विभागीय चौकशीचे स्वरुप हे तांत्रिक स्वरुपाचे असल्याने त्यांची विभागीय चौकशी मुख्य अभियंता दर्जाच्या तांत्रिक पदावरील अधिकाऱ्याकडून करुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. विषय क्र.७९५ सोबतच दिनांक १९.११.२०१६ च्या सर्वसाधारण सभेतील स्थगित विषय क्र. ७०२, ७०३, ७०४, ७०५, ७०६, ७०७ आणि ७५४ हे विषय इतर निलंबित अधिकारी आणि काही सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विभागीय चौकशीस मान्यता व निलंबन कायम करणे संदर्भातील आहेत. महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांची कमतरता, निलंबित अधिकाऱ्यांना काम न करता द्यावे लागणारे ५०% वेतन, या सर्व बाबी विचारात घेता सदर निलंबित अधिकारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व शासन निर्णयाच्या तसेच कायद्याच्या चौकटीत राहून कायद्याचे उलंघन होणार नाही याची दखल घेऊन या सर्व अधिकाऱ्यांचे निलंबन रद्द करण्यास आणि त्यांना महानगरपालिकेच्या सेवेत पुर्ववत रुजु करुन घेणेस मंजुरी देण्यात येते. ज्या अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीचे स्वरुप हे तांत्रिक कामाच्या संदर्भातील असेल अशी चौकशी सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांमार्फत करण्यात यावी. अशा प्रकारे सर्व निलंबित अधिकाऱ्यांचे निलंबन रद्द करणेस आणि निलंबित अधिकारी व इतर दोन सेवानिवृत्त अधिकारी यांची विभागीय चौकशी ही शासनाच्या नियमांप्रमाणे पुर्ण करुन पुढील योग्य ती कार्यवाही नियमानुसार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७९६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्राणिसंग्रहालयासाठी पशुवैद्यक (Zoo Veterinarian/Wild Life Expert) हे पद मानधनावर भरण्याबाबत उमेदवारांची निवड करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. सदर पदासाठी दि.१२.०४.२०१६ रोजी थेट मुलाखतीद्वारे आलेल्या उमेदवारांमधून त्यांच्या प्राप्त शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव व मौखिक मुलाखतीमध्ये प्राप्त गुणानुसार डॉ.इनामदार ख्वाजा मोईनुद्दीन यांना 'पशुवैद्यक' या पदावर करार पध्दतीने रु.२५,०००/- प्रतिमाह मानधनावर नियुक्ती देण्याबाबत त्यांच्या नावाची शिफारस निवड समितीने केली होती.

त्यानुषंगाने कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१६/६०५, दि.१२.०४.२०१६ नुसार डॉ.इनामदार ख्वाजा मोईनुद्दीन यांना 'पशुवैद्यक' या पदावर करार पध्दतीने रु.२५,०००/- प्रतिमाह मानधनावर ०६ महिन्यांकरीता अटी व शर्तीनुसार नियुक्ती देण्यात आलेली आहे. तथापि, त्यांना ०६ महिन्यांकरिता अटी व शर्तीनुसार नियुक्तीचा कालावधी दि.१३.१०.२०१६ रोजी संपलेली आहे. तसेच सद्यस्थितीत त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याबाबत उद्यान अधिक्षक तथा संचालक, प्राणीसंग्रहालय यांनी कळविले आहे.

करीता, डॉ.इनामदार ख्वाजा मोईनुद्दीन, 'पशुवैद्यक' यांना दि.१४.१०.२०१६ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्राणिसंग्रहालयासाठी डॉ.इनामदार ख्वाजा मोईनुद्दीन, 'पशुवैद्यक' (Zoo Veterinarian/Wild Life Expert) यांना दि.१४.१०.२०१६ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७९७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भावसिंगपुरा वॉर्ड क्र.१६ अंतर्गत येणाऱ्या साईनगर, कानिफनाथ कॉलनी या वसाहतींमध्ये मुलभूत सुविधांचा अभाव आहे.

करीता, सदरील वसाहतींचे सर्वेक्षण करून दलित वस्ती म्हणुन घोषित करून दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी मिळणेकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-**श्री. सुरे सीताराम इसराम

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भावसिंगपुरा वॉर्ड क्र.१६ अंतर्गत येणाऱ्या साईनगर, कानिफनाथ कॉलनी वसाहतींचे नियमाप्रमाणे सर्वेक्षण करून या वसाहती दलित वस्ती घोषित करण्यासाठी तसेच दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत शासनातर्फे निधी मिळणेकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७९८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ अंतर्गत प्रभाग क्र.११० अंतर्गत शांतीनाथ हौसींग सोसायटी मुख्य रस्ता ३० फुट रुंद प्लॉट नं.१ ते १३, मेडीकल हौसींग सोसायटी ३० फुट रुंद रस्ता प्लॉट नं.१२ ते २०, म्हाडा ३० फुट रस्ता रेल्वे ट्रॅक समांतर मुख्य रस्ता, शाकुंतल नगर मुख्य रस्ता ३० फुट रुंद प्लॉट नं.१० ते २२, पहाडे आंगण मुख्य रस्ता त्रिशरण चौक पासून या भागातील रस्त्यांचे व्हाईट टॉपींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-१६ च्या दरसुचीनूसार रक्कम रूपये ५९,९६,२३०/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा ५० टक्के खर्च जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ अंतर्गत उपलब्ध प्राप्त अनुदानातून व ५० टक्के खर्च महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पिय तरतुद रक्कमेतून करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास दिनंक ०३.१०.२०१६ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तरी जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ अंतर्गत प्रभाग क्र.११० अंतर्गत शांतीनाथ हौसींग सोसायटी, मेडीकल हौसींग सोसायटी, शाकुंतलनगर रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे या कामाचे र.रु.५९,९६,२३०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.११० अंतर्गत शांतीनाथ हौसींग सोसायटी, मेडीकल हौसींग सोसायटी, शाकुंतलनगर रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे या कामाच्या र.रु.५९,९६,२३०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७९९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११० अंतर्गत पोद्यार शाळा ते गादिया विहार शिवराज कॉलनी पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींगद्वारे विकास करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन २०१५-१६ नुसार र.रु.१,१९,६५,६६७/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक १६.११.२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारी आर्थिक तरतुद सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. तरी र.रु.१,१९,६५,६६७/- च्या अंदाजपत्रकास मान्यतेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११० अंतर्गत पोद्यार शाळा ते गादिया विहार शिवराज कॉलनी पर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींगद्वारे विकास करणेच्या कामाच्या र.रु.१,१९,६५,६६७/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलणे आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

तरी खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील लेखाशिर्ष | नविन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत विविध विकास कामे करणे. र.रु.२५.०० लक्ष.<br>पान क्र.जी.बी.आर-वॉर्ड-फ, P.No.1, अ.क्र.9 | वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत असलेल्या सहयाद्री कॉर्नर, ज्योतीनगर ते शिवमंदीर पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे कॉंक्रीटीकरण/व्हॉईट टॉपींग पध्दतीने विकास करणे. र.रु.९०.०० लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.१००, ज्योतीनगर अंतर्गत विविध रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.१५.०० लक्ष<br>पान क्र.एससीआर-वॉर्ड-फ, P.No.52, अ.क्र.69 | |
| ३. | वॉर्ड क्र.१००, ज्योतीनगर अंतर्गत मा.महापौर यांनी सुचविलेल्या अत्यावश्यक कामासाठीच्या तरतुदी अंतर्गत र.रु.२०.०० लक्ष. | |
| ४. | विकास योजना रस्ते अंतर्गत राखुन ठेवण्यात आलेल्या तरतुदी मधून र.रु.३०.०० लक्ष. | |

**सुचक:-** श्रीमती सुमित्रा गिरजाराम हाळनोर

**अनुमोदक:-** श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले,श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :- प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील लेखाशिर्ष | नविन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत विविध विकास कामे करणे. र.रु.२५.०० लक्ष.<br>पान क्र.जी.बी.आर-वॉर्ड-फ, P.No.1, अ.क्र.9 | वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत असलेल्या सहयाद्री कॉर्नर, ज्योतीनगर ते शिवमंदीर पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे कॉंक्रीटीकरण/व्हॉईट |
| २. | वॉर्ड क्र.१००, ज्योतीनगर अंतर्गत विविध रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.१५.०० लक्ष<br>पान क्र.एससीआर-वॉर्ड-फ, P.No.52, अ.क्र.69 | |
| ३. | वॉर्ड क्र.१००, ज्योतीनगर अंतर्गत मा.महापौर यांनी सुचविलेल्या | |

| | | |
|---|---|---|
| | अत्यावश्यक कामासाठीच्या तरतुदी अंतर्गत र.रु.२०.०० लक्ष. | टॉपींग पध्दतीने विकास करणे. र.रु.९०.०० लक्ष. |
| ४. | विकास योजना रस्ते अंतर्गत राखुन ठेवण्यात आलेल्या तरतुदी मधून र.रु.३०.०० लक्ष. | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८०१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथे महानगरपालिकेची शाळा आहे. ह्या शाळेला केंद्रीय शाळा ही सिडको एन-७ येथील आहे. परंतू केंद्रीय शाळा मिसरवाडी शाळेपासून बऱ्याच अंतरावर असल्यामुळे गैरसोय होत आहे. तेव्हा सिडको एन-७ हे केंद्र बदलून हडको एन-१२ या केंद्रीय शाळेस मिसरवाडी मनपा शाळा संलग्न करावे.

करीता, मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी **अनुमोदक:-** श्रीमती मलेका बेगम हबीब कुरेशी
मा.महापौर :- प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथील महानगरपालिकेच्या केंद्रीय शाळेचे सिडको एन-७ हे केंद्र बदलून सदरील शाळा हडको एन-१२ या केंद्रीय शाळेस संलग्न करण्यास मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८०२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३५ नारेगांव मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्या करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| **पान क्र.** | **अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील मंजुर कामाचे लेखाशिर्ष** |
|---|---|
| SCR Ward B-P.No.13 क्रमांक 40,41,42 | अ.क्र.४०, वॉर्ड क्र.३५, नारेगाव हनुमान मंदिरापासून ते जाकेर कूरैशी यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.१५ लाख. |
| | अ.क्र.४१, वॉर्ड क्र.३५, नारेगाव भिकनशहा यांच्या घरापासून ते मारोती मंदिरा पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे- र.रु.१५ लाख. |
| | अ.क्र.४२, वॉर्ड क्र.३५, नारेगाव शिवाजी पुतळ्या पासून ते सुरज मेडिकल पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.१० लाख. |
| | **नविन कामाचे लेखाशिर्ष** |
| | अ.क्र.४०,४१,४२, वॉर्ड क्र.३५ नारेगांव अंतर्गत विविध विकास कामे करणे र.रू.४० लाख |
| **अ.क्र.पान क्र.** | **सन २०१६-१७ प्रो-पुअर बजेट अंतर्गत लेखाशिर्ष** |
| प्रो-पुअर बजेट पान नं.०५ अ.क्र.०१ | अ.क्र.१, वॉर्ड क्र.३५, नारेगाव येथील मुख्य रस्त्यालगत नविन गटार बांधणे व अस्तित्वातील गटार दुरुस्त करणे. र.रु.२० लाख २० हजार. |
| | **नविन कामाचे लेखाशिर्ष** |
| | अ.क्र.१, वॉर्ड क्र.३५, नारेगाव, आनंद गाडे नगर अंतर्गत कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.२० लाख २० हजार. |

**सुचक:-** श्री.गोकुलसिंग संपतसिंग मलके **अनुमोदक:-** श्री.राजु रामराव शिंदे
मा.महापौर :- प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३५ नारेगांव मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| **पान क्र.** | **अर्थसंकल्प सन २०१६-१७ मधील मंजुर कामाचे लेखाशिर्ष** |
|---|---|
| SCR Ward B-P.No.13 क्रमांक 40,41,42 | अ.क्र.४०, वॉर्ड क्र.३५, नारेगाव हनुमान मंदिरापासून ते जाकेर कूरैशी यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे कॉँक्रीटीकरण करणे. र.रु.१५ लाख. |
| | अ.क्र.४१, वॉर्ड क्र.३५, नारेगाव भिकनशहा यांच्या घरापासून ते मारोती मंदिरा पर्यंतच्या रस्त्याचे कॉँक्रीटीकरण करणे- र.रु.१५ लाख. |
| | अ.क्र.४२, वॉर्ड क्र.३५, नारेगाव शिवाजी पुतळ्या पासून ते सुरज मेडिकल पर्यंतच्या रस्त्याचे कॉँक्रीटीकरण करणे. र.रु.१० लाख. |
| **नविन कामाचे लेखाशिर्ष** | |
| | अ.क्र.४०,४१,४२, वॉर्ड क्र.३५ नारेगांव अंतर्गत विविध विकास कामे करणे र.रू.४० लाख |
| **अ.क्र.पान क्र.** | **सन २०१६-१७ प्रो-पुअर बजेट अंतर्गत लेखाशिर्ष** |
| प्रो-पुअर बजेट पान नं.०५ अ.क्र.०१ | अ.क्र.१, वॉर्ड क्र.३५, नारेगाव येथील मुख्य रस्त्यालगत नविन गटार बांधणे व अस्तित्वातील गटार दुरुस्त करणे. र.रु.२० लाख २० हजार. |
| | **नविन कामाचे लेखाशिर्ष** |
| | अ.क्र.१, वॉर्ड क्र.३५, नारेगाव, आनंद गाडे नगर अंतर्गत कॉँक्रीटीकरण करणे. र.रु.२० लाख २० हजार. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८०३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ GBR WARD-A, P.No.02, SR.No.14 मध्ये वॉर्ड क्र.२१, कबाडीपुरा, बुढीलेन अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| **अ.क्र.** | **मनपा बजेट मध्ये आलेले कामाचे नांव** | **अ.प.र.रु.** | **या कामाचा समावेश करण्यात यावा.** |
|---|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.२१ अंतर्गत विविध विकास कामे करणे. | २५.०० | वॉर्ड क्र.२१ अंतर्गत जीमसाठी व्यायाम साहित्य खरेदी करणे बाबत. (रक्कम रु.१०.०० लक्ष.) |

**सुचक:-** श्रीमती परवीन खैसर खान **अनुमोदक:-** श्री.अजीम अहेमद रफीक

मा.महापौर :- प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प सन २०१६-१७ मध्ये वॉर्ड क्र.२१, कबाडीपुरा, बुढीलेन अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| **अ.क्र.** | **मनपा बजेट मध्ये आलेले कामाचे नांव** | **अ.प.र.रु.** | **या कामाचा समावेश करण्यात यावा.** |
|---|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.२१ अंतर्गत विविध विकास कामे करणे. | २५.०० | वॉर्ड क्र.२१ अंतर्गत जीमसाठी व्यायाम साहित्य खरेदी करणे बाबत. (रक्कम रु.१०.०० लक्ष.) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८०४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 'ईद मिलादुन्नबी' हजरत मुहम्मद (स.) इब्न अब्दुलाह यांच्या जन्म दिनी दरवर्षी मनपा हद्दीतील शहरातील दारुची दुकाने बंद ठेवण्यात यावीत. हजरत मुहम्मद (स.) इब्न अब्दुलाह यांनी इस्लाम धर्माचा प्रचार केला. ते पुर्ण जगासाठी शांतीचे प्रतिक होते. त्यांनी मानवजातीस दारु पिण्यास मनाई केली आहे. तरी 'ईद मिलादुन्नबी' या दिवशी संपुर्ण शहरातील दारुची दुकाने, बियर बार बंद ठेवण्यात यावेत.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जमीर अहेमद कादरी **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हजरत मुहम्मद (स.) इब्न अब्दुलाह यांच्या जन्म दिनी 'ईद मिलादुन्नबी' या दिवशी दरवर्षी प्रमाणे मनपा हद्दीत असलेली शहरातील दारुची दुकाने, बियर बार नियमाप्रमाणे बंद ठेवण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८०५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेचे प्रमुख उत्पन्नाचे स्तोत्र मालमत्ता कर आहे. सदरील मालमत्ता कराचे पुनर्मुल्यांकन करण्याचे सर्वेक्षण करण्यासाठी चार वेळेस निविदा मागविण्यात आल्या. परंतु त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. या निविदा कार्यप्रणालीत एकवर्षाचा कालावधी गेलेला असून, निविदा सूचना/जाहिरातीवर मोठ्या प्रमाणावर खर्च झालेला आहे. सदर प्रणालीत व्यवस्थित काम करण्यासाठी कुणीही पुढे येत नाही असे दिसून आले आहे.

मालमत्ता कर हे महत्वाचे उत्पन्नाचे साधन असल्याने प्रशासनाने मालमत्ता सर्वेक्षणाची निविदा रद्द करावी आणि कंत्राटी पध्दतीवर घेण्यात येणाऱ्या कर्मचारी भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकतेप्रमाणे १०० सबओव्हरसिअर जास्तीचे भरती करावेत. आणि या कर्मचाऱ्यांमार्फत स्वतंत्र सर्वेक्षण कक्ष उघडून युध्द पातळीवर शहरातील सर्व मालमत्तांचे नियोजनबध्द सर्वेक्षण व पुनर्मुल्यांकन करण्यात यावे. जेणे करून महानगरपालिकेस मालमत्ता कराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळेल आणि पर्यायाने सदरचा निधी शहर विकासाच्या कामी येईल.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नितीन दशरथ साळवी **अनुमोदक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मालमत्ता सर्वेक्षणाची निविदा रद्द करून कंत्राटी पध्दतीवर घेण्यात येणाऱ्या कर्मचारी भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकतेप्रमाणे १०० सबओव्हरसिअर जास्तीची भरती करून या कर्मचाऱ्यांमार्फत स्वतंत्र सर्वेक्षण कक्ष उघडून युध्द पातळीवर शहरातील सर्व मालमत्तांचे नियोजनबद्ध सर्वेक्षण व पुनर्मुल्यांकन करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८०६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भावसिंगपुरा वॉर्ड क्र.१६ अंतर्गत येणाऱ्या भावसिंगपुरा येथील मारोती मंदिरापासून ते भिमनगर येथील नवीन प्रवेशद्वारापर्यंतच्या मुख्य रस्त्याचे रस्ता अनुदान या योजनेतून प्राप्त अनुदान एक कोटी रुपये सदरील रस्त्याचे कॉंक्रीटकरण करण्याकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-**श्री. सुरे सीताराम इसराम

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भावसिंगपुरा वॉर्ड क्र.१६ अंतर्गत येणाऱ्या भावसिंगपुरा येथील मारोती मंदिरापासून ते भिमनगर येथील नवीन प्रवेशद्वारापर्यंतच्या मुख्य रस्त्याचे नियमाप्रमाणे रस्ता अनुदान या योजनेतून प्राप्त अनुदान एक कोटी रुपये सदरील रस्त्याचे कॉंक्रीटकरण करण्याकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८०७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड कार्यालय क्रमांक-९ अंतर्गत औरंगाबाद शहरातील महावीर चौक ते रेल्वेस्टेशन पर्यंतच्या ३५ मीटरच्या रुंद विकास योजना रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन-२०१५-२०१६ च्या दरसुचीनूसार रक्कम रुपये ५,८५,७२,८२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च विशेष रस्ते अनुदान अंतर्गत करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता प्रदान करून मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता, प्रस्तावित कामाच्या रक्कम रुपये ५,८५,७२,८२५/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड कार्यालय क्रमांक-९ अंतर्गत औरंगाबाद शहरातील महावीर चौक ते रेल्वेस्टेशन पर्यंतच्या ३५ मीटरच्या रुंद विकास योजना रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ५,८५,७२,८२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८०८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्त्यांची सुधारणा करण्याकरिता शासनास प्रकल्प अहवाल सादर करण्यासाठी पी.एम.सी ची नियुक्ती करण्याकरिताचा प्रस्ताव दिनांक २४ नोव्हेंबर २०१६ रोजी स्थायी समिती समोर आला असता तो रद्द करण्यात आला. सर्वसाधारण सभेने ठराव क्र ४३३ दिनांक १०.०५.२०१६ अन्वये शहरातील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी रु १५०/- कोटी च्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

शहरासाठी रस्त्यांची सुधारणा होणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून वर नमूद केल्याप्रमाणे स्थायी समिती सभेमध्ये पी.एम.सी नियुक्ती बाबतचा प्रस्ताव जरी फेटाळण्यात आला असला तरीदेखील शासनाकडून रस्त्यांसाठीचा निधी प्राप्त करुन घेण्याकरिता मा. आयुक्तांनी शासन दरबारी आवश्यक असणारी कार्यवाही करावी. शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या अनुसार शहरातील रस्त्यांची कामे टप्प्याटप्प्याने करण्यात यावीत.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नितीन दशरथ साळवी **अनुमोदक:-**श्री.सुभाष सयाजी शेजवळ

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्त्यांची सुधारणा करण्याकरिता सर्वसाधारण सभेने पारित केलेला ठराव क्र ४३३ दिनांक १०.०५.२०१६ अन्वये र.रु १५०/- कोटीच्या प्रस्तावास मंजुरी दिल्याप्रमाणे रस्त्यांची सुधारणा होणे अत्यंत गरजेचे असल्याने म्हणून पी.एम.सी नियुक्ती बाबतचा प्रस्ताव जरी फेटाळण्यात आला असला तरी देखील शासनाकडून

रस्त्यांसाठीचा निधी प्राप्त करुन घेण्याकरिता मा.आयुक्तांनी शासनाकडे आवश्यक पत्र व्यवहार/कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीमधुन टप्प्याटप्प्याने कामे करण्यात यावीत. त्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८०९:-</u>**

अ) प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील प्रमुख रस्त्यांवरील दुभाजकांचे सौंदर्यीकरण करुन त्यामध्ये वृक्षारोपण करण्याचे काम ड्रीमस् क्रिऐशन ॲडव्हर्टायझींग आणि फ्युचर मिडीया ॲडव्हर्टायझ ींग हया खाजगी संस्थामार्फत त्यांच्या स्वःखर्चाने करुन घेण्यात आलेले आहे. दुभाजकांमधील झाडे जगविण्यासाठी पाण्याची व्यवस्था संबंधित संस्थेकडून बोअरवेल द्वारे करण्यात आलेली आहे व त्याची देखभाल संबंधित संस्था करीत आहे. सार्वजनिक स्त्यावरील झाडांना पाणीपुरवठा करण्यासाठी जे बोअरवेल घेतलेले आहेत, त्यास महानगरपालिकेने विद्युत पुरवठा करावा.

ब) शहरातील ०१. अमरप्रित चौक ते बाबा पेट्रोलपंप चौक ०२. सेव्हनहिल ते सुतगिरणी चौक ०३. सुतगिरणी चौक ते शहानुरमियॉ दर्गा ०४. आकाशवाणी ते उच्च न्यायालय, ०५. एम.जी.एम ते बळीराम पाटील शाळा ०६. सेव्हन हिलस् ते सेंट्रल नाका या रस्त्यावरील दुभाजकांचे सौंदर्यीकरण खाजगी संस्थेने स्वःखर्चाने केलेले असून; त्याची देखभाल समाधानकारकरित्या करीत आहेत. त्यांच्या या कामाची दखल घेऊन वरीलप्रमाणे दुभाजकांचे देखभाल करण्यासाठी यापुढील दहा वर्षासाठी ड्रीमस् क्रिऐशन ॲडव्हर्टायझींग आणि फ्युचर मिडीया ॲडव्हर्टायझींग ह्या खाजगी संस्थांच्या करारनाम्याचे नुतनीकरण करुन देण्यात यावे. त्याचप्रमाणे पैठण टी-पॉईट ते झाल्टा फाटा, ॲपेक्स हॉस्पिटल ते जालना रोड, त्रिमुर्ती चौक ते आकाशवाणी ह्या रस्त्यावरील दुभाजक सुशोभिकरणाचे काम ह्याच संस्थेमार्फत करुन घेण्यात यावे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नितीन दशरथ साळवी **अनुमोदक:-**श्री.सुभाष सयाजी शेजवळ

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील प्रमुख रस्त्यांवरील दुभाजकांचे सौंदर्यीकरण वृक्षारोपण करण्याचे काम ड्रीमस् क्रिऐशन ॲडव्हर्टायझींग आणि फ्युचर मिडीया ॲडव्हर्टायझींग या संस्थांनी स्वःखर्चाने करुन त्याची देखभाल संबंधित संस्था करीत आहेत. सार्वजनिक स्त्यावरील झाडांना पाणीपुरवठा करण्यासाठी जे बोअरवेल विद्युत पुरवठा महानगरपालिकेने करण्यास मान्यता देण्यात येते.

प्रस्तावात नमुद केलेल्या अमरप्रित चौक ते बाबा पेट्रोलपंप चौक, सेव्हनहिल ते सुतगिरणी चौक, सुतगिरणी चौक ते शहानुरमियॉ दर्गा, आकाशवाणी ते उच्च न्यायालय, एम.जी.एम ते बळीराम पाटील सेव्हनहिलस् ते सेंट्रल नाका या सहा रस्त्यांवरील दुभाजकांचे सौंदर्यीकरण करुन त्याची देखभाल संबंधीत संस्थांकडून समाधानकारकरित्या करण्यात येत असल्याने पुढील दहा वर्षाकरीता ड्रीमस् क्रिऐशन ॲडव्हर्टायझींग व फ्युचर मिडीया ॲडव्हर्टायझींग हया खाजगी संस्थाच्या करारनाम्याचे नुतनीकरण करुन देण्यात यावे. त्याचप्रमाणे पैठण टी पॉईट ते झाल्टा फाटा, ॲपेक्स हॉस्पिटल ते जालना रोड, त्रिमुर्ती चौक ते आकाशवाणी ह्या रस्त्यावरील दुभाजक सुशोभिकरणाचे काम परिच्छेद (अ), (ब) मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे ह्याच संस्थांमार्फत करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

(८१० व ८११ या क्रमांकाचे कोणतेही प्रस्ताव नाहीत. अनावधानाने क्रमांक सुटलेले आहेत.)

मा.उपमहापौर :मी माझ्या वैयक्तिक बाबीमूळे उपमहापौर पदाचा राजीनामा मा.महापौर यांचे कडे सुपूर्द करीत आहे. तो त्यांनी स्विकारावा. गेल्या १९ महिन्याच्या कार्यकाळात मला विकास कामासाठी प्रदेश अध्यक्ष मा.श्री.रावसाहेबजी दानवे साहेब, मा.आमदार, श्री.अतुलजी सावे,मा.श्री.हरीभाऊ बागडे, मा.खासदार श्री.चंद्रकातंजी खैरे, शहर अध्यक्ष श्री.किशनचंद तनवाणी या सर्वांचे मोलाचे मागदर्शन लाभले. त्याच बरोबर

या सभागृहाचे सर्व सदस्य स.पदाधिकारी, गटनेते, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार बंधु यांचेही मोठे सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त करतो. (या वेळी मा.उपमहापौर श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड हे उपमहापौर पदाचा राजीमाना मा.महापौर यांचेकडे सादर करतात.)

मा.महापौर :मा.उपमहापौर श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड यांनी उपमहापौर पदाचा राजीनामा माझ याकडे दिलेला आहे तो स्वीकारण्यात येतो.

(यावेळी सदस्यांनी मा.महापौर व मा.उपमहापौर यांनी १९ महिन्याच्या कार्यकाळात केलेल्या कार्याचा गौरव तसेच आप-आपले मनोगत व्यक्त करतात.)

मा.महापौर :माझ्या महापौर पदाच्या १९ महिन्याच्या कार्यकाळात मला शिवसेना पक्ष प्रमुख मा.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब तसेच या जिल्हयाचे मा.पालकमंत्री श्री.रामदासजी कदम साहेब विधान परीषद अध्यक्ष मा.श्री.हरीभाऊजी बागडे, मा.खासदार श्री.चंदकांतजी खैरे,मा.श्री.रावसाहेबजी दानवे, संपर्क नेते मा.श्री.विनोदजी घोसाळकर,मा.जिल्हा प्रमुख श्री. अंबादासजी दानवे, सर्व मा.आमदार तसेच सभागृहातील सर्व स.पदाधिकारी सर्व स.सदस्य व महिला सदस्या, मनपाचे सर्व गटनेते, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार बंधु व मिडीयाचे सर्व प्रतिनिधी या सर्वांचे सहकार्य लाभले त्यामूळेच मी हा कार्यकाळ पार पाडू शकलो सर्वाचे आभार व्यक्त करतो. ज्येष्ठ स.पालिका सदस्य श्री.बन्सी ग्यानु जाधव यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहावे.

(या वेळी स.पालिका सदस्य श्री.बन्सी ग्यानु जाधव हे पीठासीन अधिकारी म्हणून काम करतात.)

मा.महापौर :माझ्या वैयक्तिक बाबीमूळे व यापूढे मी पुरेसा वेळ देऊ शकणार नसल्यामूळे मी आज दिनांक ३० नोंव्हेंबर २०१६ रोजी महापौर पदाचा राजीनामा पीठासीन अधिकारी यांचेकडे देत आहे.

(या वेळी श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांनी महापौर पदाचा राजीनामा मा.पीठासीन अधिकारी यांचेकडे सादर केला.)

पीठासीन अधिकारी :आताच श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांनी महापौर पदाचा राजीनामा माझ्याकडे दिलेला आहे तो मान्य करण्यात येतो.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे पीठासीन अधिकारी यांनी जाहिर केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

महापौर
महानगरपालिका औरंगाबाद